महालेखा परीक्षकांचे दिनांक 4.5.11 नुसार महालेखापालांकडे उपलब्ध असलेल्या माहितीची प्रमाणपत्र तसेच लेखा विभागाकडील सन 2011-2012 ची नोंदवही पडताळणी केली असता, खालील तपशिलात नमूद केल्या प्रमाणे मार्च 2012 अखेर अधिकारीकर्मचारी तसेच इतर व्यक्तींकडे (पूर्वलक्षीत) एकूण रक्कम रुपये 214040/- इतकी अग्रीम वसूल जमा समायोजनाकरीता प्रलंबित असल्याचे दिसून येते

तपशील	रक्कम
2010-2011 अखेर पर्यंत	54000
सन 2011-2012 मध्ये	160040
एकूण	214040

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) सन 2010-2011 पूर्वी अदा केलेल्या अग्रीमाच्या रक्कम बाबत संबंधितांनी आज पावेतो जर्या बाबी करीता अग्रीम देण्यात आला होता त्या कारिता खर्च केल्याची अद्यापून आलेले नाही. खर्ची अथवा संबंधितांकडे रक्कम असल्या शिल्लकीचे रक्कम बाबत कार्यालयी वसूल नेमलेल्याचे अधिनियमित झालेली असून अद्याप पडताळणी पश्चात्तुरे अद्याही झालेल नाही. शासन निर्देश प्रमाणे अग्रीम पटलास अग्रीम देणे या रकमेची सोबत अग्रीम पटलात नोंदवत संबंधित अधिकारी जबाबदारी निश्चीत करून वसुलीची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक आहे.

2) सन 2011-2012 मध्ये विविध कारणासाठी अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात आलेली अग्रीम रक्कम पटलात नोंदविण्यात आलेल्या नाही. शासन निर्देश क्रमांक 35 दिनांक 03/01/2006 नुसार कोषागारी प्रकरणे अग्रीम पटलात घेणे बाबतचे शासनाचे निर्देशानुसार देयकाची अग्रीम रक्कम मंजूरीची अनिवार्यता झालेली आहे. महाराष्ट्र नागरीसेवा नियम संहिता 1971 चे नियम 140 नुसार मार्च 2012 अखेर (आर्थिक वर्षाचा शेवटी) संबंधित अग्रीम रक्कमचे प्रकरणनिहाय समायोजन होणे आवश्यक असताना अंतिम करण्यात आली नाही. त्यामुळे मार्च 2012 अखेर एकूण रक्कम रुपये 160040/- नोंदविण्यात राहीली आहे. सदर रक्कमेचा पैसाचार होऊन ती बाबतचे संबंधितांकडून रक्कम वसूलपात्र होणे आवश्यक आहे.

3) नोंदवहीचे पडताळणी केली असता मार्च 2012 अखेर वार्षिक लेखाचे (अंतिम विनियम) नोंदविण्यात आलेल्या नाही. त्यामुळे पानाचा मेळ घालने अग्रीम नोंदविण्यात आलेल्या नाहीत. तसेच संबंधित अधिकारी यांनी घेतील अग्रीम रक्कम प्रलंबित केलेल्या संबंधितांनी विभागाने उपलब्ध केलेल्या व नोंदवहीत नमूद असलेल्यापैकी अद्यापर्यंत पडताळणी झालेली नाही. याबाबत नियमोचित कार्यवाही करून अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

संगणक निष्पत्ती

नमुनाप्रमाणे रक्कम रुपये 214040/-

16	पल्स पोलिओ अभियानासाठी मासणी नसबंदीच्या वेळी करीता अतीम भत्ता देणे बाबत.

दिनांक 19 फेब्रुवारी 2012 रोजी पल्स पोलिओ लसीकरण अंतीम करीता जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर यांची पत्र क्र 487 दिनांक 14/02/2012 अन्वये सदर मोहिमेकरीता 28 पर्यवेक्षक कामे करण्यास प्रस्ताव सादर केली असल्याने महानगरपालिकेने आपल्या स्तरावरुन पर्यवेक्षकांसाठी 28 ऑटो रिक्षाची व्यवस्था करुन देणेबाबत सूचित केले असल्याने महानगरपालिकेने सदर आदेशाचा विचार करुन खालील प्रमाणे एकूण रक्कम रुपये 38400/- इतका अंतीम भत्ता मंजूर केला असून अंतीम भत्ता करण्याची मंजूरी मिळणेबाबत केली आहे.

ई. क	दिनांक	रक्कम	नावे	तपशील	
376	02/03/2012	38400	श्री. अतुल मोहे स्वच्छता निरीक्षक	दि.19 फेब्रुवारी 2012 रोजी पल्स पोलीओ लसीकरण करीता.	
			1) ऑटो रिक्षा ट्रक्टर अंतीमता		19500
			2) 20 वेतर		3000
			3)		3500
			4) स्टेशनरी		1200
			5) पीन, टोपी		500
			6) उदघाटन पोटो		500
			7) पर्यवेक्षक करीता अंतीम		6000
			8) लेन्टीन मानधन		1000
			9) मास्क		3200
			एकूण		38400

वरीलप्रमाणे अंतिमतः प्रस्तावित रक्कमेची आहेत.

1) तसेच दिनांक क.35 दिनांक 03/01/2006 अन्वये कोणतेही अंतीम मंजूर करण्यात आली असल्याने सर्वसाधारण अंतीम रक्कम वजा करण्याची अंतिमतः प्रस्तावित आहे.

2) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर यांचे पत्रानुसार महानगरपालिकेस 28 पर्यवेक्षकांकरीता 25 ऑटो रिक्षाची व्यवस्था करण्याचे सुचित केले असल्याने उपरोक्त प्रमाणकाचे व्यवस्थेचे लिपीक यांना (म.क.7 प्रमाणे) रु.6000/- दिनांक ठरत असलेली रक्कम रु 38400/- मधूनच त्यांचे मानव कक्ष भत्ता केले यांचेकडे व्यवस्थापी लिपीक यांना अदा करुन व भत्ता रक्कम रु 32400 (38400 - 6000) त्यांना देणे आवश्यक आहे.

3) सबबीसाठी माह 2012 अखेर पर्यंत अंतीम रक्कम रुपये 38400/- याबाबत सामाजीक / दुरुस्त करण्याचा प्रस्ताव नाही. म्हणजे 38400/- रोजचा दरने सदर प्रस्तावित नाही. महानगर पालिका नियम 1971 चे नियम 140 व 141 नुसार प्रत्येक आर्थिक वर्ष संपल्यानंतर सदर अंतीम रक्कमेचे प्रमाणकाचा मंजूर होणे आवश्यक आहे.

तसेच, वरील रक्कम रुपये 38400/- अंतीम प्रमाणे अदा करण्यात येत आहे.

म.न.पा. लिपीक

मंजूरपात्र रक्कम रु.32400/-

(4)

आक्षेपाधिन रक्कम रु. 6000/-	
एकूण	रु.38400/-

—•••—

17 पंचशिल वार्ड जटपूरा गेट ते पंचशिल चौक ते अनुजा हॉस्पीटल ते बँक ऑफ इंडीया पर्यंत रस्ता डाबरीकरण कामातील अनियमितता.

अ.क्र.	बाब	तपशिल
1	लेखा शिर्ष	बी.आर.जी.ए.(B.R.G.F.)
2	प्रशासकीय मान्यता	जिल्हाधिकारी चंद्रपूर पत्रक क्र.10/103 दि.16/02/2010 रु. 7080500/-
3	तांत्रिक मान्यता	कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.चंद्रपूर, रु.708/0500/-
4	निविदा रक्कम	रुपये 6874274/-
5	निविदा प्रकार	जाहीर निविदा
6	निविदा प्रसिध्दी व कालावधी	दैनिक लोकशाही दिनांक 13/03/2010 ते 23/03/2010 एकूण 10 दिवस
7	प्राप्त निविदा	एकूण चार
8	मंजूर निविदा तपशिल	निविदा दर 0.10% अ.प.र. पेक्षा कमी मक्तेदार नांव- मे.रामा इंफ्रास्ट्रक्चर
9	न.प.सभा समितीची मंजुरी	ठराव क्रमांक 13 दिनांक 21/04/2010
10	कार्यादेश	मुख्याधिकारी पत्रक क्रमांक 337/28/07/2010
11	कामाची मुदत	सहा महीने
12	काम पूर्ण दिनांक	23/07/2011
13	मोजमाप पुस्तक क्रमांक	117, पा.नं. 6 ते 7, एमबी 90/39-37
14	काम मुदतीत पूर्ण आहे	नाही मुदत वाढ कालावधी घेतलेला नाही
15	करारनामा	आहे रु.100 मुद्रांकावर
16	जिल्हा दर सूची वर्ष	2009-2010
17	खर्चाचा तपशिल	

प्र.क्र.	दिनांक	रक्कम	तपशिल
1	27/01/12	3484930	अंतिम
—	—	3585302	पहिले धावते
	एकूण	7070232	

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत

1) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम संहिता 1984 मधील परिच्छेद क्रमांक 142 नुसार तसेच शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण -1098/(96/98) मो.प्र. दिनांक 04/09/2000 नुसार अंदाजपत्रक तयार करताना बांधकाम

₹1.00 = 1063/- अदा करण्यात आले आहे. सदर खर्चे अनामत कामाचा खर्च असून शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

4) सदर निविदा मंजूरीचा एक झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोटिंग प्रमाणपत्र पाहता ही संस्था कमीत 50 लक्ष रुपयांचे दुरुस्ती कामे पंधरा वर्षात अनुभवाचे दिसत. तसेच परीक्षणीय निविदा भरून ती संस्था आवश्यक अर्हतेस पात्र ठरली. त्यानुसार संस्थेच्या निविदा मंजूर करून कामाचे आदेश देण्याची शिफारस केली. त्यानुसार निविदाकाराचे होत असल्याचे दिसून येते.

5) ठेकेदाराने निविदेतील अनुसूची व सदर प्रस्ताव सोबत मशिनरी मजूरकामेकरी, वाहन दुरुस्ती सुस्थितीचा दाखला तसेच आयकर विभागाचे असल्याचे व सदरचे काम कुशल कंत्राटदार असल्याचे सकलेदार सदर सादर केली. परंतु संस्थेने कामाचा वाहनाचा विभागाने निविदा मंजूर करताना खात्री केलेली नाही. उपरोक्त अ.क्र. 4 व 5 नुसार सदरची निविदा पद्धतीचा संतोष झालेली आहे.

6) कामातील दुरुस्ती अनियमितता -

अ) शासन निर्देशानुसार ₹ 10.00 लक्ष ते कामाकरीता ₹ 100/- चे मुद्रांकावर व त्यानंतरच्या प्रत्येकी 1.00 लक्ष करीता ₹ 100/- प्रमाणे वेगळ्या मुद्रांकावर कामाचा करारनामा करण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार सदर कामाकरीता ₹ 6200/- इतक्या रकमेचा मुद्रांकावर करारनामा होणे आवश्यक होते. तथापी सदर कामाकरीता ₹ 100/- चे मुद्रांकावर करारनामा केल्याने ₹ 6100/- चे मुद्रांक नुकसान झाले आहे. रककम वसुल होणे आवश्यक आहे.

ब) ठेकेदाराने विहीत मुदतीत काम पूर्ण केले असून कामास मुदतवाढ मागणी केलेली नाही. यामुळे मुदतवाढ निविदा अटी शर्ती व करारनामा अटी नुसार देडलाक कारवाही होणे आवश्यक होते. विभागाने त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

क) सदर कामाची निविदा प्रक्रियेची राज्यस्तरीय वृत्तपत्रात केलेली नाही. व त्याचे प्रमाणे शासन निर्देशानुसार ई-टेंडरींग प्रक्रिया करून निविदा मागविलेल्या नाहीत.

ड) सदर कामाकरीता 661.73 घ.मी. दुरुस्ते मौण खनिज साहित्य वापरण्यात आले असून रॉयल्टी रककम रुपया ₹.35/- या दराने ₹.24910/- वसुल केले आहेत. सदर रॉयल्टी दर 71 प्रमाणे वसुलीं होणे आवश्यक होते. म्हणे रॉयल्टी वसुल रककम 23822/- याप्रमाणे कडुन वसुल होऊन शासन सदरी भरणा होणे आवश्यक आहे.

इ) ठेकेदार सोबत करारनामा वापरलेले इमरातचे तपशील, बीलेक इत्यादी सादर केलेले नाही.

फ) सदर कामाचे ठेकेदार पात्रता केल्याबद्दल तेव्हा विभागाने सीलमाय पुरस्कारात कंपनीट करून सदरचे ठेकेदार अपात्र ठरविले नाही.

उपरोक्त अभिप्रायानुसार कामातील खर्चे एकूण रककम रुपये 7070232/- खालीलप्रमाणे प्रमाणक करण्यात येत आहे.

बी.आर.जी.एफ.

मान्यतादिन रककम रुपये 6488501/-

(मुद्दा क्र.2 व 3) वसुलपात्र रककम रुपये 581731/-

एकूण रककम रुपये 7070232/-

(मुद्दा क्र.6) वसुलपात्र रककम रुपये 29922/-

18 इमारत/गाळे/मार्केट/आठे थकीत भाडे व कर रकमा यांची वसूली मालमत्तेतून सूट देऊन मालमत्ता कमी केल्याने झालेले आर्थिक नुकसानी बाबत

सन 2011-2012 अखेर थकबाकी एकूण रक्कम रुपये 4484311/- इतकी मागणी होती. व त्यापैकी एकूण रक्कम रुपये 2939422/- पालक मंत्री यांनी मंजूर केलेली रक्कम रुपये 1558372/- इतकी कमी आली आहे. व उर्वरीत रक्कम रुपये 2239524/- एकूण मालमत्ता सूट वजा होऊन चालू आर्थिक वर्षात कायम स्वरुपी कमी झालेली मागणी खालील प्रमाणे नमूद करण्यात आला आहे

अ.क्र.	मार्केट नाव	सन 2010-11 अखेर थकबाकी (रुपये)	सन 2011-12 चालू मागणी (रुपये)	एकूण मागणी रक्कम	वसूल मागणी रक्कम	वसूल मागणी रक्कम	शिल्लक दर्शविलेली रक्कम
1	मेन मार्केट	38658	106208	144876	13702	98656	32518
2	बसव मार्केट(जुने)					2007	
3	बीएस मार्केट(जुने)	864	428	1292	0	195	1097
4	मंगळवार मार्केट	11728	128579	140307	8123	124974	97210
5	शिवाजी नगर गाळे	612328	317369	929697	73309	87603	768785
6	संजय गांधी मार्केट-1	114082	1055554	1169636	114082	985485	70069
7	संजय गांधी मार्केट-2	52164	137968	190132	52164	118136	19832
8	संजय गांधी मार्केट-3	11959	97384	109343	11959	88799	8585
9	बसव मार्केट	393871	778848	1172719	377636	655787	139296
10	नेहरू मार्केट	523967	102342	626309	37447	77882	510980
	एकूण	1756631	2727680	4484311	688422	2239524	1558372

सरासरी अभिप्राय सुटीस प्रमाणे आहेत

1) शासकीय मालमत्ता वसूल केल्या प्रमाणे एकूण रक्कम रुपये 2239524/- इतकी सूट वजा होऊन सन 2011-2012 ची एकूण मागणी रक्कम रुपये 4484311/- वजा करुन सन 2012 अखेर थकबाकी रक्कम रुपये 1558372/- इतकी दर्शविण्यात आली आहे. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 व नियम

[illegible] आपले सौजन्याचा सहकार्याबद्दल व आर्थिक सहाय्य त्वरीत करुन [illegible] मदत आहोत
[illegible] दुकाने दुरुस्ती गाळे [illegible] दोन दुकाने बांधून त्याचे पहिल्या मजल्यावर [illegible]
[illegible] व शौचालये बांधणे [illegible] मजला वाढ करणे आदिचे कामासाठी मजला आदिचे दुरुस्ती [illegible]
[illegible] असे सोबत कागदपत्रे [illegible] आहे.

(1) [illegible] कामे सबंधी सादरीची [illegible]

म.न.पा. दिघी

वसुलात रक्कम रुपये 2239524/-

अपेक्षित रक्कम रुपये 1558372/-

एकूण रक्कम रुपये 3797896/-

---

19 मालमत्ता नोंदवहीतील संबंधित मालमत्तेची नोंद घेवून स्वरुपी कमी करुन झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत (7 मालमत्ता इमारत मार्केट)

सन 2011-2012 या आर्थिक वर्षाचे मध्ये विश्लेषणात्मक व्यापारी गाळे पाडकामी मालमत्ता नोंदवही पडताळणी केली असता सन 2010-2011 या आर्थिक वर्षाचे अखेरीस गाळा पाडकामाचे समोर दर्शविलेल्या आहे व मालमत्ता नोंदवहीत सध्या तेथे आर्थिक वर्षात नोंदविण्यात आलेल्या दराविषयी [illegible] पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	प्रभाग	मालमत्ता	सन 2010-2011 मालमत्ता नोंदवही नुसार पाडकामी					
1	दिघा गाव	पाडकाम मालमत्ता दिघा गाव दिघा डोंगर कार्यालय दुरुस्ती व नवीन कार्यालय बांधणे	36624	17744	8942	26081	16962	106353
2	"	दुकानगाळे दुरुस्ती व नवीन संडास व आरसी	102051	11034	2750	25810	10208	151863
3	"	पाडकाम दोनमजली इमारत	104328	11280	2800	26552	10440	155400
1	तळवली	अनधिकृत आर	70278	7596	1897	0	6000	85765
2	तळवली	पाडकाम पत्राशेड	544226	58768	14694	132246	54422	804356
1	तळवली	पाडकाम मोर्चे अनधिकृत	50600	5473	1371	14010	5294	76748

						एकूण		1380485

वसूलपात्र मालमत्ता पुढीलप्रमाणे आहेत.

1) महानगरपालिका नगर पालिका नियम अधिनियम 1971 चे नियम 78(2)(A) नुसार मालमत्ता कर थकीत असलेल्या मालमत्ता धारकांना मालमत्ता जप्ती करण्यापूर्वी सदर मालमत्तेवर बोजा नोंदविणेबाबत नोटीस बजावणे आवश्यक आहे. सदर मालमत्ता धारकांना मालमत्ता जप्ती करण्यापूर्वी दुरुस्तीसुद्धा सदरील नोटीसला उत्तर देखील मिळाले नाही. सदर उपरोक्त नमूद केलेल्या सर्व मालमत्ता धारकांकडील थकबाकी वसूलपात्र रक्कम रुपये 1380485/- अद्यापिपर्यंत वसूल झाली नाही. त्यामुळे दिलेल्या रक्कमेने मालमत्ता कराची वसुली न झाल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. तरी मागणी रक्कम रुपये 1380485/- पुनर्वसूलीत अडचितांकडून वसूल होणे आवश्यक आहे. व या प्रकारे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही याबाबत विभागाने नियमोचित कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

2) प्रस्तुत परिशिष्टातील गाळे धारक विभागाने मागणी नोटीसीत वाढ मागणी नोटिसीनंतर त्यांनी गाळे आपोआप खाली झाल्यास होते किंवा कसे याबाबत तसेच परिगणना अद्ययावत करता आलेली नाही. तरी याबाबत उचित कार्यवाहीचे अनुपालन देण्यात यावे.

3) एकत्रीत रक्कम रुपये 1380485/- वसूल करून घेण्यात यावी.

मालमत्ता विभाग

वसूलपात्र रक्कम रुपये 1380485/-

---

20 गाडेपट्टे करीत इमारत / गाळे यांची मागणी नोटिसची व थकबाकी बाबतची अनियमितता.

महानगरपालिकेच्या व्यापारी संकुल दुकाने, गाळे इत्यादी मालमत्ता गाडे पट्टे तत्त्वावर भोगवटादार यांना दिलेल्या आहेत. सन 2011-2012 अखेरची मागणी नोटिसची (वसुली क्रमांक 81) पडताळणी केली असता, पत्र विभागाने उपलब्ध केलेल्या विवरणपत्र क्रमांक 4 नुसार दिनांक 31/03/2012 अखेर भोगवटादाराकडे एकूण रक्कम रुपये 5137735/- इतके आहे व मालमत्ता कर यादी वसूली अभावी रक्कम थकीत असल्याचे दिसून आले.

याबाबत अधिनियम खालील प्रमाणे आहेत.

1) संबंधित भोगवटादारांसोबत झालेल्या करारनाम्या नुसार गाडे दरमहा वसूल होणे आवश्यक असताना सदर गाळे वसुलीची आकारणी होत असताना गाळे रक्कम थकीत राहण्याबाबत कुठलीच बाब झालेली नाही. सदरची बाब महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणल्याचे त्याचा परिणाम अधिकाऱ्यांवर झाला असून करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाले आहे.

2) भोगवटादाराकडून मालमत्ता व इतर कर रक्कम विहीत कालमर्यादेत (वेळ मर्यादेत) वसूल करण्यात विलंब केल्यामुळे व मुळात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 128 तरतुदीनुसार दिले रक्कम वसूल करण्याचा पहिला केलेला असल्याने सन 2012 अखेर रक्कम थकित झालेली असल्याचे आढळून आले आहे.

3) विभागाने सन 2011-2012 करिता परिगणित केलेल्या मागणी नोटिसची पडताळता वसूल क्रमांक 81

[illegible] 110) प्रमाणे त्यात फक्त आहे मागणी बाबतचा तपशील नोंदविलेली नमूद असताना त्यात आहे दरवर्षी [illegible] ते होते करांची नोंद घेण्यात येऊन नोंदवहीतील रकाना क्र.2 ते 17 मधील आवश्यक त्या नोंदी [illegible] आलेल्या नसल्याने आक्षेप तत्कालीन इमारतीचा तपशिल आक्षेप मालकी आदेश, दिनांक, [illegible] क्रमांक, आक्षेप मुदत, इत्यादी बाबतची महत्त्वपूर्ण माहिती नोंदी अभावी पडताळता आलेली नाही. सदरची [illegible]

ब) महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 76 नुसार मालमत्ता कर व इतर करांचे मागणी [illegible] क्रमांक 43 चे विहीत नमुन्यात मागणी नोंदवही स्वतंत्रपणे परिरक्षित करण्यात आलेली नसल्याने आक्षेप [illegible] इमारतनिहाय, क्षेत्र इत्यादी बाबत मागणी दर्शविलेली मालमत्ता कराची अचूकता पडताळता आलेली नाही. सदरची मागणी स्वतंत्र दर्शविणे आवश्यक आहे.

क) मागणी नोंदवहीत दर्शविलेल्या फलनिहाय वेतन व वार्षिक [illegible] पेन्शनीने [illegible] [illegible] आलेल्या असल्याने व सक्षम अधिकारी यांनी त्या प्रमाणित ही केलेल्या नसल्याने नमूद आकडेवारीची अचूकता पडताळता येत नाही.

उक्त निरीक्षणाची एकूण रक्कम रुपये 5137735/- वसूल होणे आवश्यक असून आक्षेपानुसार [illegible] करावे.

[illegible]

वसुलपात्र रक्कम 5137735/-

***

2) मागणी नोंदवहीत नोंदविलेल्या मालमत्तावर एकत्रित मालमत्ता कराची मागणी न करणेची अनियमितता.

सन 2011/2012 करीता कर विभागाकडील एकत्रित मालमत्ता कर मागणीनोंदवहीची पडताळणी केली असता, लेखापरीक्षणात परिशिष्ट क्रमांक 3 मध्ये उदाहरणादाखल नमूद केलेल्या मालमत्तावर कराची [illegible] अशी कोणत्याही प्रकारची मागणी/आकारणी विभागाने केलेली नाही. संबंधित मालमत्ताधारक कर विभागाकडे [illegible] सदर कराची मागणी न करण्याचे प्रयोजन/आदेश/मंजुरी इत्यादी बाबतची नोंद मागणी नोंदवहीत आढळून न आल्याने त्या बाबतची सत्यता पडताळता आलेली नाही. त्यामुळे नगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. वास्तविकतः महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 76 मधील [illegible] सदर [illegible] आदेशाशिवाय [illegible] दुरुस्ती आदेश बदल करता येत नसताना [illegible] नमूद मालमत्तांवर एकत्रित मालमत्ता कराची [illegible] मागणी नियमबाह्यपणे न करण्याची अनियमितता विभागाने केली आहे. याबाबत लेखा परीक्षणास अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

***

22 एकत्रित मालमत्ता कराच्या मागणी नोंदवहीतून मालमत्ता धारकांची नावे कमी करणे तसेच थकीत कराच्या रकमांची नोंद कायम स्वरुपी कमी करणे/ कमी रकमेने ओढणे इत्यादी बाबतची अभिप्रायांकित...

सन 2011-2012 करीता का. (मालमत्ता-कर) एकत्रित मालमत्ता कर मागणीनोंदवहीची पडताळणी केली असता अनुक्रमांकाकरता परिशिष्ट क्रमांक 4 मध्ये दर्शवल्याप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्ता धारकांची नावे मागणी नोंदवहीतून कमी केल्याचे महत्त्वाच्या मालमत्ता पत्रकाकडून एकत्रित मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या मालमत्ता धारकांच्या मागणी बिलांची नमूद केलेल्या का. प्रकारची मागणी विभागाने केलेली नाही. तसेच मालमत्ता धारकांच्या मालमत्तांचे हस्तांतरण झालेले असतांना जुनी नोंदवहीतून मालमत्ता धारकांची नावे कमी करण्याची कार्यवाही केलेली नाही. तसेच मालमत्ता धारकांकडे (सन 2010-2011 ची नोंदवही नुसार मालमत्ता शिल्लक असलेल्या) थकबाकी मागणी ची केल्याने महापालिकेचे होणारे उत्पन्नाचे परिशिलनात नमूद असलेल्या रकमेचे रुपये 2,36,656/- कायम स्वरुपी नुकसान झालेले आहे.

तसेच परिशिष्ट क्रमांक 5 मध्ये उदाहरणादाखल नमूद केल्या प्रमाणे सन 2010-2011 या वर्षाच्या अखेरीस थकीत रक्कम सन 2011-2012 ची मागणी नोंदवहीत न घेतल्याने / कमी रकमेने दर्शविल्या असल्याने संबंधीत थकबाकी मागणी नोंदवहीतून कायम स्वरुपी कमी झाल्याने महानगरपालिकेचे परिशिष्टातील रक्कम रुपये 36,486/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे नियम 76 मधील तरतुदी प्रमाणे सन्मानीय वर्षाच्या कराच्या रकमेची संपूर्ण वसूली वर्षाच्या मागणी नोंदवहीत अनुक्रमांकाने घेतल्या बाबत संबंधित अधिकारी यांनी खाली करून त्या मागणी वसूलपात्र पात्रतेच मागणी नोंदवहीत नोंदविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तसेच प्रतिवेदन केल्याचे परिशिष्ट क्रमांक 4 व 5 मधील मालमत्ता धारकांची नावे व एकत्रित मालमत्ता कराच्या सन 2010-2011 व 2011-2012 ची मागणी नोंदवहीतून कमी करणे/ कमी रकमेने नमूद करणे इत्यादी प्रकरणी कार्यवाही केलेली नाही.

सदर बाबतचा अभिप्राय लिखीत स्वरुपात देण्यात यावेत व दोन्ही परिशिष्टातील एकत्रित रक्कम रुपये 2,73,142/- सदरील नमूद वित्तवर्षातील सन 2011-2012 करीता मागणी नोंदवहीत मालमत्ता धारकांच्या नावासह मालमत्तेनुसार प्रमाणित करण्यात यावे. व वसूली संबंधित कार्यवाही तातडीने बाबत दक्षता घेण्यात यावी.

सन 2010-2011
वसूलपात्र रक्कम रुपये 2,73,142/-

---

23 नगर पालिका व्यापारी संकुल (राजकमल टॉकीज) गाळेधारकांना थकीत मालमत्ता कराचा सूट दिल्याने झालेल्या आर्थिक नुकसाना बाबत

सन 2011-2012 (सन 2010-2011 अखेर) करीता राजकमल टॉकीज जवळील व्यापारिक व्यापार संकुल गाळे धारकांकडील मागणी नोंदवही पडताळणी केली असता या मालमत्ताधारकांचे परिशिष्ट क्रमांक 6 मध्ये नमूद केलेल्या मालमत्ताधारकांचे सन 2010-2011 अखेर मालमत्ता कराच्या रकमा थकीत होत्या मात्र सन 2011-2012 ची मागणी नोंदवहीत सन 2010-2011 चे मोजण्यात/ समावेश करीत कोणतीही बाकी नसे दिसत

25	विवाह नोंदणी फी व शास्तीची रक्कम शासनाकडे जमा न करणेची अनियमितता

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 नुसार व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. का-13/ रक्का/विवाह नोंदणी दिनांक - /04/2008 नुसार विवाह नोंदणी करण्याचे काम नगरपालिका / महानगरपालिका यांना दिनांक 01/05/2008 पासून हस्तांतरीत करण्यात आले आहे. त्यानुसार महानगरपालिकेने सन 2011-2012 या आर्थिक वर्षात विवाह नोंदणी करीता नोंदणी फी व शास्ती ची रक्कम म्हणून एकूण रक्कम रुपये 60600/- वसूल केलेली आहे.

याबाबत अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत

1) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 चे नियम 12 नुसार निबंधकाकडे आलेली सर्व फी आणि शास्ती यांची रक्कम शासकीय कोषागारात जमा करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट निर्देश असतानाही महानगर पालिकेने सन 2011-2012 मध्ये जमा केलेली विवाह नोंदणी फी व शास्ती रक्कम एकूण रुपये 60600/- नियमबाह्यपणे महानगरपालिका निधीत जमा असल्याचे आढळून आले आहे. *

2) विवाह नोंदणीचे काम दिनांक 01/05/2008 पासून तत्कालीन नगरपालिका व तदनंतर महानगरपालिके कडे हस्तांतरीत करण्यात आले असल्याने व आजपर्यंत संस्थेने विवाहनोंदणी फी व शास्ती रक्कमेचा शासकीय कोषागारात भरणा केला नसल्याने, रक्कमेची परिगणना करून रक्कम शासकीय कोषागारात सत्वर भरणा होणे आवश्यक आहे.

उपरोक्त अभिप्रायानुरूप अनुपालन दर्शवावे

वसूलपात्र रक्कम रुपये 60600/-

26	विवाह मंडळाची नोंदणी व फी वसूल न केल्याने झालाल्या आर्थिक नुकसानी बाबत

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम 1999 मधील नियम 3 नुसार निबंधकाच्या स्थानिक अधिकार क्षेत्रातील विवाह मंडळे यांची नमुना- अ मध्ये नोंदणी व नुतणीकरणसाठी अर्ज सादर करून अर्जासोबत रु.5000/- फी प्राप्त करून घेणे आवश्यक असून नमुना- ह नोंदवहीत विवाह मंडळाची नोंद घेण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. का-13/ रक्का/विवाह नोंदणी दिनांक - /04/2008 नुसार विवाह नोंदणी करण्याचे काम दिनांक 01/05/2008 पासून नगरपालिका / महानगरपालिका यांचे कडे हस्तांतरीत झाले असल्याने उपरोक्त नियमान्वये महानगरपालिका क्षेत्रातील विवाह मंडळाचे नोंदणी व नुतणीकरणाचे व फी घेण्याचे तसेच नमुना- ह नोंदवही अद्यावत करण्याचे काम महानगरपालिका यांचे असतानाही सन 2011-2012 अखेर पर्यंत विवाह मंडळाची नोंदणी व फी वसुलीची तसेच नोंदवही परिरक्षित करण्याची कार्यवाही झालेली नसल्याने शासकीय महसुलाचे कायम स्वरूपी नुकसान झाले आहे व होत आहे. तरी नियमातील तरतुदी प्रमाणे विवाह मंडळाची नोंदणी/ नुतणीकरण व फी वसुली करून शासन सदरी भरणा होणे बाबत जबाबदारी निश्चीत होणे आवश्यक आहे.

27.	नागरी सुविधा केंद्र व कार्यालय करीता संगणक लेन चे काम करणे बाबत.

खालील तपशिलात नमूद केल्या प्रमाणे महानगरपालिकेने नागरी सुविधा केंद्र व कार्यालयासाठी संगणक नेट वर्कीग (लेन) चे काम जाहीर निविदा मागवून कॉम्प्युटर वर्ल्ड यांची कमी दराची निविदा (वाटाघाटीने कमी केलेल्या) मंजुर करून कामाचे आदेशान्वये काम करून घेऊन रक्कम रुपये 257440/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशिल
438	13/03/2012	257440	U.T.P. केबल व इतर साहित्य आणणे व लावणे
	एकूण	257440	

याबाबत अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 158 व 161 नुसार सदर कामास सक्षम तांत्रिक अधिकारी यांची बाब निहाय अंदाजपत्रक तयार करून (नकारी आराखडेसह) तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही.

2) निविदा प्रसिध्दी करताना अंदाजपत्रकीय रक्कमे सारखी महत्वपूर्ण बाब नमुद न करताच निविदा प्रसिध्द करण्याची अनियमितता झालेली आहे.

3) महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 167 नुसार मक्तेदाराने मान्य बाब निहाय काम करणे बंधनकारक असताना खालील नमुद महत्वपूर्ण कामे प्रत्यक्षात केलेली नाहीत यामुळे मक्तेदाराने लेन चे काम परिपूर्ण / संपूर्ण केलेले नसताना रकमा अदा होण्याची अनियमितता झाली असून, मक्तेदाराचे आर्थिक हित जोपासणारी ही बाब आहे.

बाब	दर
24 पोर्ट जॅक पॅनल	3508/-

4) मक्तेदाराने खालील तपशिलात नमूद कामे केली असून त्या करीता रक्कम रुपये 5560/- इतका खर्च झालेला आहे. मात्र केलेली कामे ही अतिरिक्त असून त्याबाबत निविदा दर प्राप्त करून घेण्यात आले नसल्याने सदर कामाची (बाबींची) प्रत्यक्षात खरोखर आवश्यकता होती किंवा कसे याबाबत सक्षम तांत्रिक अधिकारी यांची मुळात व तदनंतर ही मान्यता घेण्यात आलेली नसल्याने खर्चाची अचुकता पडताळता येत नाही. सबब खर्च रक्कम रुपये 5560/- लेखा परिक्षणात मान्य करता येत नाही.

बाब	परिमाण	दर	अदा रक्कम
केसींग पट्टी फिटींग	नमुद नाही	2400	2400
		1960	1960
		1200	1200
		एकूण	5560

5) महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 180 नुसार सदर केलेल्या कामाचे परिमाणे (बाब निहाय) नमुना नंबर 136 चे मोजमाप पुस्तकात नोंदविणे आवश्यक असताना नमूद नियमानुसार मोजमाप

पुस्तकात परिमाणे नमूद करण्यात आलेली नसल्याने गुत्तेदाराने केलेल्या कामाची अचुकता पडताळता येत नाही सबब, कामावरील खर्च रक्कम रुपये 257440/- खालील प्रमाणे अमान्य करण्यात येत आहे.

म.म.पा. निधी

वसुलपात्र रक्कम रुपये 5560/-

आक्षेपाधीन रक्कम रुपये 250880/-

एकूण रक्कम रुपये 257440/-

—***—

28	महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर शासन सदरी भरणा करणे बाबत झालेली अनियमितता.

कर विभागाकडील माहे ऑक्टोबर 2011 ते मार्च 2012या कालावधीत खालील तपशिला प्रमाणे मालमत्ता करा सोबत शिक्षण कर व रोजगार हमी कर (गॅरंटी) रकमा वसुलात झालेल्या आहेत. महाराष्ट्र शासन, महसुल व कर विभागाचे परिपत्रक क्रमांक ई.एस.बी.सी./1075/15045/1/2, दिनांक 29/07/1998 तसेच महाराष्ट्र शिक्षण कर, जमीन इमारत परवाना नियम 1962 चे कलम 5 मधील तरतुदी प्रमाणे वसुलात शिक्षण व रोजगार हमी कर यांच्या वसुल रकमा सत्वर शासन सदरी दोन टक्के रिबीट वजा जादा उर्वरीत रक्कम भरणा होणे आवश्यक आहे. मात्र महानगरपालिकेने तपशिलात नमूद दोन टक्के रक्कम रुपये रिबीट म्हणून वजावट न केल्याने पर्यायाने शासनास अनुक्रमे शिक्षण कर व रोजगार हमी कराच्या रकमा रु.230620/- व रु.30420/- या जादा भरणा केला आहे. यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. संबंधित शासकीय यंत्रणेकडून उपरोक्त रक्कम प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे.

कालावधी	वसुल रक्कम		दोन टक्के रिबीट रक्कम		शासनास भरावयाची रक्कम	
	शिक्षण कर	रोजगार हमी कर	शिक्षण कर	रोजगार हमी कर	शिक्षण कर	रोजगार हमी कर
ऑक्टो.2011	565000	94000	11300	1880	553700	92120
नोव्हे. 2011	878000	99000	17560	1980	860440	97020
डिसे. 2011	2702000	359000	54040	7180	2647960	351820
जाने. 2012	2695000	343000	53900	6860	2641100	336140
फेब्रु. 2012	1859000	242000	37180	4840	1821820	237160
मार्च 2012	2832000	384000	56640	7480	2775360	376320
एकूण	11531000	1521000	230620	30420	11300380	1490580

म.म.पा. निधी

वसुलपात्र रक्कम रु.261040/-

(शिक्षण व रो.ह.कर)

—***—

29 | 11 वा वित्त आयोग निधी अंतर्गत मंजुर कामावरील खर्च नियमबाह्यपणे 12 वा वित्त आयोग निधीतून नियमबाह्यपणे अदा करणे बाबत.

खालील तपशिलात दर्शविल्या प्रमाणे 12 वा वित्त आयोग निधी अंतर्गत खर्च प्रमाणके पडताळता, नमूद केलेल्या कामावर रक्कम रुपये 40296/- मक्तेदारास अदा करण्यात आली आहे.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशिल
7 16.12.05	13/01/2012	40296	के.एस. पोटदुखे, मक्तेदार यांना जि.प. शाळा ते डॉ.झाडे हॉस्पीटल पर्यंत भुमीगत नालीचे काम करणे काम पूर्ण दि.16/12/2005.
	एकूण	40296	

1) तपशिलात नमूद केलेले काम हे 11 वा वित्त आयोग निधी अंतर्गत सक्षम प्राधिकाराकडून प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त झालेले काम असून या कामासाठी तत्कालीन नगरपालिकेने आर्थिक तरतुद सदर लेखा शिर्षाखाली केलेली होती व त्यातून या कामाचे धावते देयके अदा झालेली आहे. तदनंतर 11 वा वित्त आयोग निधी संपुष्टात आल्याने असे प्रलंबित देयके तत्कालीन नगरपालिकेने आपल्या स्वनिधीतून पारीत करणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही महानगरपालिका अस्तित्वात आल्यावर संबंधितांनी न करता 12 वा वित्त आयोग अंतर्गत उपलब्ध झालेल्या निधीतून नियमबाह्यपणे केल्याचे आढळून आले आहे.

2) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 44 नुसार मुदतबाह्य / एक वर्षावरील प्रलंबित मागण्या असल्यास त्यास महानगरपालिकेची पूर्व मंजुरी प्राप्त करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही झालेली नाही.

3) सदरचे देयक काम पूर्ण दिनांक 16/12/2005 नंतर सत्वर प्रदान होणे आवश्यक असताना इतक्या मोठ्या विलंबाचे कोणतेही कारण सक्षम प्राधिकाराने विषद केलेले नसल्याने विलंबाने अदाईगीची कार्यवाही पडताळता आलेली नाही.

सबब, दुसऱ्या लेखा शिर्षातून नियमबाह्यपणे प्रदान केलेली खर्च रक्कम रुपये 40296/- लेखा परिक्षणात जमाल्य करण्यात येत असून शासन सदरी भरणा करून अनुपालन दर्शवावे.

12 वा वित्त आयोग निधी
वसुलपात्र रक्कम रुपये 40296/-

---***---

30 | नियमबाह्यपणे विमान प्रवास करणे व प्रवास रक्कम खर्च करणे बाबत.

खालील तपशिलात दर्शविल्या प्रमाणे महानगरपालिकेचे प्राधिकृत अधिकारी यांनी वेळोवेळी विमानाने प्रवास करून प्रवास भत्ता करीता एकूण रक्कम रुपये 19229/- खर्च केला आहे.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशिल
505	28/03/2012	2100	प्राधिकृत अधिकारी व शहर अभियंता यांच्या

			विमान प्रवासाचे तिकीट व केलेचे प्रतिपुर्ती मुलक अट
506	28/03/2012	8408	प्रतिनियुक्ती अधिकारी दमाळा तसेच सीटचे करणे बाबत आयोजित सहयासाठी विमानाचे केलेला प्रवास
507	28/03/2012	8721	प्रतिनियुक्ती अधिकारी मध्यवर्ती अनुज्ञप्ती योजना महाराष्ट्र मुंबई व विभागीय आयोजित बैठक साठी मंत्रालय, मुंबई येथे जाणेसाठी विमानाने प्रवास
	एकूण	19229	

वरीलप्रमाणे खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहे

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक एसआर-1010/प्र.क्र.2/सेवा-5, दिनांक 03/3/2010 परिच्छेद 4.1 नुसार तसेच मुंबई नागरी सेवा नियम 1959 मधील नियम 417ब आणि 450 तसा मजकुरी प्रमाणे विमानाने प्रवास करणारी व्यक्ती सचिव दर्जा पेक्षा कमी नसावी असे स्पष्ट नमूद असल्याने वरीलप्रमाणे एकूण खर्च रक्कम रुपये 19229/- नियमबाह्य पडी करण्यात आलेला आहे.

2) शासनाने शासन निर्णयानुसार अत्यावश्यक परिस्थितीत विमानाने प्रवास करणे आवश्यक असल्यास, संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांची लेखी पूर्व परवानगी घेऊन शासकीय विमान प्रवास (नियंत्रण कक्षाकडे नोंदणी करावी) करावा, असे स्पष्ट नमूद केले आहे.

सबब उपरोक्त नमूद अनुषंगे असलेले विमानाचे खर्चे एकूण रक्कम रुपये 19229/- चेक परिक्षणात आक्षेप घेत येत आहे. वसुलीची कार्यवाही तीन आवश्यक आहे.

सही/-
(अनुक्रमांक 1 ते 30 रुपये 19229/-

---

31 | प्रवासाचे तिकीट व इतर साहित्य खरेदी बाबत

मेसर्स याहिमेनी आणीत (पावतीनुसार) दरोबीच्या प्रवासी प्रवासाचे/तिकीट व इतर साहित्याची खरेदी केली खर्चाचे रक्कम रुपये 342940/- खर्च केलेला आहे

प्रवासाचे क्रमांक	दिनांक	रक्कम	नावे	तपशील
541	31/03/2012	33500	कॉम्प्युटर वर्ल्ड	प्रिंटर शाई डिस्क रेम व माऊसेअर खरेदी
421	07/03/2012	52000	कॉम्प्युटर वर्ल्ड	Sony vaio C.E.35 लॅपटॉप क्र.1 मुख्याधिकारी यांचे करीता खरेदी

11-12

438	13/03/2012	257440	कॉम्प्युटर वर्ड	UTP केबल व इतर
390	02/03/2012	98605	प्राईम कॉम्प्युटर्स सर्व्हीसेस	साहित्य खरेदी संगणक 02 नग प्रिंटर 01 नग UPS 02 नग
	एकूण रक्कम	441545		

याबाबत अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 25 नुसार सन 2011-2012 चे महानगर पालिका चे मंजूर अर्थसंकल्प सदर बाबी करीता आर्थिक तरतुद केले बाबत सत्यता पडताळता आलेली नाही.

2) प्रमाणक सोबत संबधिताने बीजके सादर केलेली नसतांना लेखा विभागाने कोणत्या निकषावर टेबके पारीत केलीत याबाबतची सत्यता पडताळता आलेली नाही. सदर बाब वित्तीय औचित्या अनुसार नाही.

3) सदर साहीत्य खरेदी करण्यापूर्वी विभागाने शासनाचे दर करार होते किंवा कसे याबाबत कोणतीही सत्यता/ चाचपणी केल्याचे आढळ होत नाही.

4) सदर साहित्याचीच खरेदी ही शासन निर्णय दिनांक 02/01/1992 व तत्सम निर्देशानुसार / मार्गदर्शक सूचना नुसार उचित कार्यवाही न करता (निविदा, दरकरार, शिफारस पावती इत्यादी) झालेली आहे.

5) प्रमाणक क्रमांक 421 नुसार मुख्याधिकारी यांचेसाठी खरेदी केलेल्या लॅपटॉप साहित्याची कोणतीही नोंद (जंगम मालमत्ता नोंदवही) घेण्यात आल्याचे आढळून आलेले नाही. यामुळे सदरचा लॅपटॉप आजमितीस कोणाचे ताब्यात आहे व त्याच्या पासून कोणती फलश्रुती महानगर पालिकेने साध्य केली, इत्यादी महत्वपूर्ण बाबी पडताळता आलेल्या नाही. यामुळे सदर साहीत्यावरील खर्चे रु.52000/- लेखा परिक्षणात अमान्य करण्यात येत आहे.

6) उपरोक्त तपशिलातील साहित्य शासकीय यंत्रणेत काहून उपलब्ध करून घेण्यात आलेले नाही. त्याच प्रमाणे टेबकासोबत साहीत्याची हॅंरंटी कार्ड इत्यादी सादर करण्यात आले नाही. यामुळे खरेदी साहित्य हे उचित स्वरूपाचे असण्याची सत्यता पडताळता आलेली नाही.

उपरोक्त अनियमिततेमुळे खर्चे रक्कम रुपये 441545/- खालील प्रमाणे अमान्य करण्यात येत आहे.

म.न.पा. निधी

वसुलपात्र रक्कम रुपये 52000/-

आक्षेपार्हित रक्कम रुपये 389545/-

एकूण रुपये 441545/-

32	बॅलेट युनिट आणने कामी वाहतूक व मजुरी साठी प्रदान अग्रीमा बाबत.

प्रमाणक क्रमांक 543 दिनांक 31/03/2012 अन्वये रफीक रहेमान शेख, प्रकल्प अधिकारी यांना रक्कम रुपये 10000/- इतका अग्रीम सार्वत्रीक निवडणुक 2012 करीता आवश्यक असलेले 100 बॅलेट युनिट आणणे करीता लागणारा वाहतुक व मजुरी करीता लागणारा खर्चे म्हणून अदा करण्यात आला आहे.

1) प्रमाणकाची पडताळणी केली असता, अव्वर सचिव, राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र

क्रमांक तनिआ/मनपा/2011/प्र.क्र.15/का-5, दिनांक 07/04/2012 अन्वये 100 बॅलेट युनिट हे नागपूर महानगरपालिका यांचे कडून उपलब्ध करून घेण्याचे आदेश असताना, अग्रीम मंजूर टिपणीत सदरचे युनिट लाचिरोली येथून आणावयाचे असल्याचे नमूद करून अग्रीम खर्चास मान्यता घेतल्याचे दिसून येते. तसेच अपरोक्त लक्षात प्राधिकाऱ्याचे आदेश हे दिनांक 07/04/2012 रोजीचे असताना अग्रीम रक्कम मात्र दिनांक 31/03/2012 रोजी म्हणजेच आदेश प्राप्त होण्यापूर्वी संबंधीतास प्रदान केल्याचे आढळून आले आहे. यावरून सदर अग्रीमाचे प्रदान हे नमूद कारणासाठीच झालेले दिसून येत नाही. यामुळे रक्कम रुपये 10000/- चे प्रदान नियमबाह्य ठरते. त्याचप्रमाणे आजपर्यंत अदा अग्रीम रकमेची संबंधीताकडून वसुली अथवा समायोजन झालेले नसल्याने रक्कम लेख्या बाहेर राहून रकमेचा संबंधीताने रकमेचा गैरवापर करण्याची अनियमितता झालेली आहे. सबब रक्कम रुपये 10000/- संबंधिताकडून सत्वर वसुल होणे आवश्यक आहे.

मनपा निधी

वसुलपात्र रक्कम रुपये 10000/-

---***---

33	जादा आतिकालिक भत्ता प्रदाना बाबत.

खालील तपशिलात उदाहरणादाखल नमूद केलेल्या वाहन चालकांच्या अतिकालीक भत्ता प्रदान प्रमाणकांची पडताळणी केली असता, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अकाश/1311/प्र.क्र.9/सेवा-6, दिनांक 09/09/2011 नुसार सुधारीत अतिकालीक भत्ता दर रुपये 40/- प्रतीतास प्रमाणे आतिकालीक भत्ता परिगणना करून रकमा प्रदान करण्यात आल्या आहेत. तथापि, संबंधितांनी रविवार किंवा सुटीच्या दिवशी वाहन चालविण्याचे काम केले बाबत मागणी केलेल्या अतिकालीक भत्याची परिगणना चुकीची केली आहे. वास्तविकता महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आकाश/1395/17/सेवा-9, दिनांक 09/11/1995 नुसार रविवार किंवा सुटीच्या दिवशी वाहन चालकाने वाहन चालविण्याचे काम केले असल्यास नियमित अतिकालीक भत्ता ज्या पध्दतीने अनुज्ञेय ठरतो म्हणजेच कामाचे 9 तास वजा जादा केलेले काम हे अतिरीक्त काम असून त्यावर अतिकालीक भत्ता देय ठरतो. मात्र संबंधितांनी तपशिलात नमूद केलेल्या सुटीच्या दिवसाच्या अतिकालीक भत्याची परिगणना करतांना एकूण तासातून कामाचे 9 तास वजावट न करता संपूर्ण तास अतिकालीक भत्ता म्हणून परिगणना करून मागणी केल्याने एकूण रक्कम रुपये -1220/- चे जादा प्रदान संबंधिताना झाले आहे. सबब सदर रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	आतिकालीक भत्ता जादा प्रदान
501	28/03/2012	5320	श्री सुरेश अडगुळे दि.10/12/2011 सुटी 15 तास - 9 तास =6 तास x दर 40= 240/- दि.11/12/2011 सुटी 14 तास -9 तास = 5 तास x दर 40= 200/- दि.08/12/2011 सुटी 16 तास -9 तास = 7 तास x दर 40= 420/-

				दि.24/12/2011 सुटी 15 तास -9 तास = 5 तास x दर 40= 200/-
				दि.25/12/2011 सुटी 13 तास -9 तास = 4 तास x दर 40= 160/-
				एकूण 240+200+420+200+160 = 1220/-

मनपा तिजोरी

वसुलपात्र रक्कम रुपये 1220/-

34	आवक-जावक कामी वापरण्यात येणा-या तिकीटाचा हिशेब नसले बाबत.

आवक-जावक पत्रव्यवहाराचे काम पहाणा-या लिपीकाकडील सन 2011-2012 चे तिकीट हिशेबाची तपासणी दिनांक 19/05/2014 रोजी केली असता, दिनांक 17/05/2014 रोजी आवक-जावक नोंदवही नुसार एकूण रक्कम रुपये 4190/- इतक्या मुल्याचे टपाल तिकीटे शिल्लक असल्याचे आढळून आले. सदर तिकीटाची दर निहाय प्रत्यक्ष पडताळणी कामी तिकीटाची संबंधितांकडे मागणी केली असता, त्यानी तिकीटे उपलब्ध करुन देण्यात असमर्थता दर्शविली आहे. सदर बाब गंभीर असून नोंदवही नुसार प्रमाणक क्रमांक निरंक दिनांक 09/05/2014 रोजी लेखा विभागाकडून रक्कम रुपये 5000/- टपाल तिकीट खरेदी कामी अग्रीम प्राप्त करुन घेतला आहे. याअर्थी संबंधितांने दिनांक 09/05/2014 ते 17/05/2014 (प्रत्यक्ष तपासणीच्या दिनांका पर्यंत) या कालावधी पर्यंत रक्कम लेखा बाहेर ठेवण्याची गंभीर अनियमितता केली आहे. वास्तविकता, महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 143 नुसार नमुना क्रमांक 113 मध्ये तिकीटाची खरेदी व वापर याचा हिशेब ठेवणे आवश्यक असून हाती शिल्लक राहीलेल्या प्रत्यक्ष किंमतीच्या तपशील दर्शविला नाही. तसेच तशी नियमोचित कार्यवाही झालेली नाही.

उपरोक्त नियमातील तरतुदी प्रमाणे सक्षम प्राधिकृत अधिकारी यांचे कडून हाती असलेल्या शिल्लक टि. केटाचा तपशिलाची कोणतीही पडताळणी होत नसल्याचे निदर्शनास आले असून यामुळे तिकीट खरेदी कामी अग्रीम रक्कम रोखीने प्राप्त करुन रक्कम लेखा बाहेर ठेवण्यासारखी गंभीर वित्तीय अनियमितता होत असल्याचे आढळून आले आहे. तरी संबंधितांकडून सत्वर रक्कम रुपये 4190/- वसुल करुन मनपा निधीत जमा करण्यात यावा व नियमातील तरतुदी प्रमाणे नियमोचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मनपा निधी

वसुलपात्र रक्कम रुपये 4190/-

35	पत्रकारांना फोल्डर फाईल व तत्सम स्टेशनरी साहित्य पुरविणे खर्ची बाबत.

प्रमाणक क्रमांक 509 दिनांक 28/03/2012 अन्वये मे.शाश्वत ट्रेडर्स, घाटपूर यांना दिनांक 19/03/2012 रोजी सार्वत्रिक निवडणूक 2012 करीता आयोजित पत्रकार परिषद (प्रेस कॉन्फरन्स) करीता उपस्थित पत्रकारांना फोल्डर फाईल, पेन व नोट पॅड इत्यादी स्टेशनरी साहित्य पुरवठा केल्या बाबत रक्कम रुपये 1400/- अदा करण्यात आले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 तसेच शासनाचे आदेश, शासन निर्णय, स्थायी निर्देश इत्यादी अन्वये उपरोक्त खर्ची बाबत कोणतीही तरतुद नसतांना तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 25 नुसार मंजुर अर्थसंकल्पात तरतुद केली नसतांना उपरोक्त कामी केलेला खर्च रक्कम रुपये 1400/- नियमबाह्य ठरतो. तसेच वाटप साहित्याबाबत पत्रकारांची पोच पावती प्रमाणका सोबत जोडण्यात आली नाही. सबब, खर्च रक्कम वसुल होऊन अनुपालन देण्यात यावे.

म.न.पा.

दिनांक

वसुलपात्र रक्कम रुपये 1400/-

-----***-----

36	विना अनुदानीत शैक्षणिक संस्थांना शिक्षण कराच्या सुट दिल्याने होत असलेल्या आर्थिक नुकसानी बाबत.

सन 2008-2009 ते 2011-2012 या वर्षाकरीताचे करमुल्य निर्धारण नोटवहया पडताळणी केली असता, महानगरपालिका हद्दीतील सर्व अनुदानीत व विना अनुदानीत शैक्षणिक संस्थांना महाराष्ट्र शिक्षण कर आकारणी करताना सरसकटपणे देय असलेल्या महाराष्ट्र शिक्षण कराच्या 50 टक्के दरा इतकी सुट/सवलत देण्यात आलेली आहे. वास्तविकता बघता विना अनुदानीत शैक्षणिक संस्थांना शासनाकडून कोणतेही अनुदान देय नसल्याने त्यांना शिक्षणकराच्या 50 टक्के इतके दिलेले सुट ही नियमबाह्य ठरत असून सदरच्या सवलतीमुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. तसी विना अनुदानीत शैक्षणिक संस्थाच्या संदर्भात महाराष्ट्र शिक्षण कर 100 टक्के दराने पहिलेसी प्रमाणे आकारणी होऊन वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

-----***-----

37	शिक्षण कर व रोजगार हमी कर वसुल रक्कम शासन सदरी उशिरा भरणा केले बाबत

महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर (उपकर) अधिनियम 1962 चे कलम 4 व 5 नुसार मालमत्ता धारकाकडून एकत्रित मालमत्ता कर रकमेवर विहीत दराने शिक्षण कर व रोजगार हमी कर आकारणी करुन वसुलीची कार्यवाही करण्यात आली आहे. माहे ऑक्टोबर 2011 ते मार्च 2012 या महापालिका कालावधीत कर विभागाकडे जमा झालेली शिक्षण कर व रोजगार हमी कर यांची एकत्रित पटणी (भरणा स्लिप) नोटवही व

अदासारण रोखवही मध्ये जमा व शासन सदरी भरणा केलेली रक्कम यांचा ताळमेळ घेतला असता, खालील तपशिलात नमूद केलेल्या कालावधीतील वसुलत शिक्षण व रोजगार हमी कर रकमांचा सत्वर शासन सदरी भरणा झालेला नाही. सदर रकमा महापालिकेकडे जमा असलेला शासन सदरी विलंबाने भरणा करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे नाही. तरी नियमानुसार प्राप्त होणाऱ्या शिक्षण व रोजगार हमी कर यांचा सत्वर दोन टक्के रिबेट वजा जाता उर्वरीत रक्कम भरणा होणे आवश्यक आहे. तरतुदी प्रमाणे कार्यवाही झाल्याचे अनुपालन दर्शवावे.

कालावधी	वसुल रक्कम		शासन सदरी भरणा रक्कम		भरणा दिनांक	विलंब दिवस
	शिक्षण कर	रोजगार हमी कर	शिक्षण कर	रोजगार हमी कर	शिक्षण कर	रोजगार हमी कर
ऑक्टो.2011	565000	94000	565000	94000	18/11/2011	18
फेब्रु 2012	1859000	242000	1859000	242000	15/03/2012	15

---***---

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे कलम 9 (क) खालील अनियमितता

---निरंक---

---***---

भाग- 2 इतर अनियमितता

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे कलम 9 (ड) खालील अनियमितता

38	आस्थापना खर्च बाबत

सन 2011-2012 या आर्थिक वर्षातील महानगरपालिका कालावधीचे (दिनांक 25/10/2011 ते 31/03/2012) करीता लेखा विभागाकडे इकडील अभिप्राय पत्र 1 दिनांक 17/02/2014 अन्वये मागणी करुनही व वारंवार मौखीक व प्रत्यक्ष भेटीअंती आस्थापना खर्चाच्या टक्केवारीचे विहीत नमुन्यातील विवरणपत्र लेखा परिक्षणाकामी सादरीकरणी सादर केलेले नाही. यामुळे महानगरपालिकेने आस्थापना खर्च टक्केवारी स्थायी निर्देश क्रमांक 26 दिनांक 23/02/2005 मध्ये नमूद केलेल्या टक्केवारीच्या सुत्रानुसार परिगणीत केली किंवा कसे या बाबत अभिप्राय पडताळता आलेली नाही.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2006/वर्गीकरणाप्र.क्र.379/05/न.6वि.24, दिनांक 4 मे, 2006 नुसार "ड" वर्गातील महानगरपालिकाच्या आस्थापना खर्चावर नियंत्रण राहाणेसाठी आस्थापना खर्चाची मर्यादा जास्तीत जास्त 35 टक्के इतकी आणि रेखीत असून आस्थापना खर्च 30 टक्के पेक्षा जादा होत असेल तर संबंधित महानगरपालिकेस नविन पदे निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीस पाठविण्यात येऊ नये असे स्पष्ट नमूद केले आहे. मात्र सन 2011-2012 करीता महानगरपालिकेचा आस्थापनेचा खर्चाची विहीत टक्केवारी अभिलेखे अभावी पडताळता आलेली नसल्याने महानगरपालिकेचा सन 2011-2012 मधील आस्थापना खर्च मर्यादीत टक्केवारीत (35 टक्के इतका) झाला किंवा कसे या बाबत कोणतेही सत्यता पडताळता आलेली नाही. तरी सन 2011-2012 करीता आस्थापना खर्च टक्केवारी विहीत मर्यादेत झाली असले बाबतचे अनुपालन योग्य त्या अभिलेख्यासह सादर होणे आवश्यक आहे.

---***---

39	पटणी नोंदवही (भरणाकिर्द) मध्ये पावती क्रमांक व पुस्तक क्रमांक नमूद न करता रकमा वसुल करणे व नोंदविणे बाबत.

सन 2011-2012 या आर्थिक वर्षातील दिनांक 25/10/2011 ते 31/03/2012 या कालावधीतील महानगरपालिके कडून विविध कर, मालमत्ता कर, फी, अनामत रकमा, किरकोळ वसुलीच्या रकमा इत्यादी वसुल करताना नमुना क्रमांक 2, नमुना क्रमांक 49 इत्यादी विहीत नमुन्यातील मुद्रीत व महानगरपालिकेने पुरविलेल्या पावती निहाय वसुलीचे काम करण्यात आलेले आहे. तथापि लेखा परिक्षणात वसुल रकमा व वापर पावती पुस्तक यांची संबंधित विभाग व वसुल कर्ते यांचे कडून जमा पावतीचा तपशिल भरणाकिर्द (पटणी), मागणी नोंदवही, भरणा चलन इत्यादी महत्वाच्या अभिलेख्यात नोंदविण्यात येत नाही. त्याऐवजी संबंधित वसुलकर्ता यांचे कडून स्वतंत्र पावती पुस्तक क्रमांक व पावती क्रमांक देण्यात येऊन त्या अनाधिकृत क्रमांकानी वसुल रकमांचा तपशिल उपरोक्त अभिलेख्यात नोंदविण्यात येतात. महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 12, 78(3), 85,86,110 इत्यादी प्रमाणे वसुल होणाऱ्या किंवा महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या रकमांच्या संदर्भात विहीत नमुन्यातील पावती पुस्तक व पावती प्रमाणे वसुल करून त्यावरील तपशिल पावत्याच्या क्रमांकानुसार नोंदवून संकलित करणे अनिवार्य आहे. मात्र उपरोक्त कालावधीत नियमबाह्य पणे कार्यवाही झालेली आहे. मात्र उपरोक्त कालावधीत नियमबाह्यपणे कार्यवाही झालेली आहे. यामुळे सदर कालावधीत वसुल रकमांच्या नोंदी अनाधिकृत ठरल्या असून वसुलात रकमांची अभिलेख्यांमधील नोंदीची अचुकता लेखा परिक्षणात प्रमाणित होऊ शकलेली नाही व नियमातील तरतुदीचे उल्लंघन होऊन पावती पुस्तक क्रमांक व पावती क्रमांक मुद्रांकित (मुद्रीत) करण्याचा मुळ हेतू/ उद्देश यामुळे सफल झालेला नाही. तरी नियमानुसार मुद्रीत क्रमांक अभिलेख्यात नोंदविण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

---***---

40 एकाच कामाबाबी साठी मुलभणूक केलेल्या रकमेपेक्षा कमी/जादा व्याज दराने व्याज रक्कम प्राप्त होणे बाबत.

सन 2011-2012 करीता (सदर्भ कार्यालयीन) कार्यालय लेखा विभागाकडील मुलभणूक लेखापरीक्षणी केली असता परिशिष्ट क्रमांक 7 मधील उदाहरणादाखल नमूद केलेल्या पंढरपूर महानगरपालिकेने रकमांची मुलभणूक (एम मुलभणूक विविध बँक खाती केलेली आहे. रकमेची मुलभणूक करण्याबाबत व मुलभणूकीची मुदत संबंधितांना प्राप्त होणा-या व्याज दराने मान्यतादर (कमी किंवा जादा) मंजूरी घेतलेली नाही. महानगरपालिका लेखा विभागाकडून रकमांची मुलभणूक करताना जादा व्याज देणा-या बँकेमध्ये मुलभणूक करणे अपेक्षित होते. सदर त्रुटी कार्यालयीन पत्रव्यवहार व केलेल्या तोंडी कार्यालयीन व मुलाखतीमध्ये निदर्शनास आणून रकमा मुलभणूक कमी दराने व्याज रकमा प्राप्त केल्याने आर्थिक नुकसान महानगरपालिकेस होत असल्याचे दिसून आले. याबाबत विभागाचे प्रतिसाद/खुलासे करण्यात यावेत.

---

41 सर्वसाधारण रोखवही (हे बुक) व बँक पासबुक मधील शिल्लक असलेल्या रकमांबाबत तपासणी बाबत.

सन 2011-2012 (महापालिका कार्यालयीन) करीता महापालिका निधी साठी विविध बँकेमध्ये खाली दिलेल्या 31/03/2012 अखेर शिल्लक असलेल्या रकमा दि 06/09/12 लेखा विभागाकडील सर्वसाधारण रोखवही (हे बुक) व बँक पासबुकांची पडताळणी केली असता खालील तपशिल प्रमाणे रकमेचा आढळून आलेला आहे.

अ.क्र	रोखवही/बँक तपशिल	बँक पासबुक प्रमाणे दि.31/03/2012 अखेर शिल्लक	सर्वसाधारण रोख बहि.नं. दि.31/03/2012 अखेर शिल्लक	तफावत
1	इंटर बँक (खा.क्र 10144548776)	7929149=08	5691355=82	2237793=26
2	बँक नं. (खा.क्र 10144440507)	1710678=98	971095=09	739783=89
3	दुकान गाळा (खा.क्र 1797)	125567=49	118804=49	6763=00
4	बँक (खा.क्र 0051010000058419)	9203621=49	8773073=68	569252=11
5	जीवितव्यय फंड ऑफ को-पासुअलटी (खा.क्र 020220100017370)	1321180=64	1209713=64	111467=00
6	IDBI(Royalty)	1116957=49	728018=49	388939=00

	(खा.क्र.91310010003355)			
7	P.N.B (Com) (खा.क्र.66838)	4993512=72	4309249=72	684263=00
8	Co-Op Bk	–	2803=02	2803=02
		29400867=89	22704843=87	6696024=02

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) नुसार प्रत्येक महिन्याच्या शेवटी रोखवही व बँकखाती शिल्लक राहीलेल्या प्रत्येक महिन्याच्या शेवटी व वर्षे अखेरीस (मार्च 2012) शिल्लक रकमांच्या तफावतीचा ताळमेळ घेतलेला दिसून येत नाही. यामुळे रोखवही मधील एकूण शिल्लक व बँक पासबुकातील एकूण शिल्लक यांची एकत्रीतपणे रक्कम रु.6696024=02 इतकी प्रचंड तफावत प्रथम दर्शनी आढळून आलेली आहे. नियमातील तरतुदी प्रमाणे लेखा विभागाने नियमित ताळमेळ घेणे आवश्यक आहे. नियमीत ताळमेळ घेतला जात नसल्याने तफावतीत दिवसेंदिवस वाढ होत असून ती निरंक होण्याकरीता योग्य कार्यवाही होऊन अनुपालन दर्शवावे.

---***---

42	धनादेशाने रकमांचे प्रदान न करणे बाबत.

लेखा विभागाकडील सन 2011-2012 करीताचे सर्वसाधारण रोखवही (दि.25/10/2011 ते 31/03/2012) पडताळता अहवाला सोबतचे परिशिष्ट क्रमांक 8 मध्ये उदाहरणादाखल नमूद केलेल्या रकमांचे प्रदान धनादेशाद्वारे करण्यात आलेले नाही.

महाराष्ट्र नगरपालिका 1971 चे नियम 44(4) नुसार रक्कम रुपये 1000/- पेक्षा जादा रकमेचे प्रदान हे रेखांकित धनादेशान्वये होणे आवश्यक आहे. मात्र विभागाने नियमबाह्यपणे रकमांचे प्रदान करण्याची अनियमितता केली आहे. याबाबत नियमोचित कार्यवाही करण्याची योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे.

---***---

43	दर महा रोखवहीतील रोख रकमेची पडताळणी न करण्याची अनियमितता.

सन 2011-2012 (माहे ऑक्टोबर 2011 ते मार्च 2012 पावेतोचे) चे लेखा परिक्षण कालावधीत लेखा शाखेची रोकडवहीची पडताळणी करीत असताना दर महिन्यातून एकदा अचानकपणे शिल्लक असलेल्या रकमाचा आढावा घेऊन ती रोकडवहीतील नमूद शिलकेशी पडताळून सक्षम अधिकाऱ्याने स्वाक्षांकीत करून प्रमाणित केल्याचे आढळून आलेले नाही. वास्तविकता महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 62(2) नुसार सक्षम अधिकारी यांनी दर महिन्यातून एकदा अचानक पणे अशी कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदरची बाब नियमोचित नसून नियमातील तरतुद ही आर्थिक व्यवहारात होणाऱ्या अनियमितता / गैरव्यवहार टाळण्यासाठी, रोखण्यासाठी असून त्याचा नियमित वापर होणे आवश्यक आहे.

---***---

44	मार्च 2012 अखेर शिल्लक रकमांचे (बँक खाती) प्रमाणपत्र प्राप्त न करणे बाबत.

सन 2011-2012 (म.न.पा. कालावधी) करीता लेखा विभागाकडील सर्वसाधारण रोखवही (डे-बुक) पडताळणी करता, दिनांक 31/03/2012 अखेर विविध बँक खाती रकमा शिल्लक असून त्याची पडताळणी करता एकाही बँके कडून शिल्लक रकमेचे प्रमाणपत्र संबंधित बँकेकडून विभागाने प्राप्त करून घेतलेले नाही. त्यामुळे पासबुकातील शिल्लक रकमांचा ताळमेळ घेता आलेला नाही. शिल्लक रक्कम निहाय संबंधित बँकांचे दिनांक 31/03/2012 अखेरचे प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध होणे आवश्यक असून यापुढे प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यात येतील याची योग्य ती दक्षता विभागाने घ्यावी.

45	दवाखाना बाह्य रुग्न सेवा (ओपीडी) फी वसुली विना पावतीने करण्याची अनियमितता.

महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 12 नुसार महानगरपालिकेकडे येणाऱ्या किंवा जमा होणाऱ्या कोणत्याही रकमांची विनाअपवाद नमुना क्रमांक 2 मध्ये निर्देशित केल्या प्रमाणे जमेच्या दिनांकास पैसे देणाऱ्या व्यक्तीस त्या रकमेची पावती देणे आवश्यक आहे. असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. तथापी, सन 2011-2012 करीता (म.न.पा. कालावधीत) दवाखाना विभागाकडील बाह्य रुग्न सेवा (ओपीडी) करीता पटणी नोंदवही पडताळणी केली असता, ओपीडी फी (नवीन रुग्न रु.10/- व जुने रुग्न रु.5/- दराने) संबंधितांकडून वसूल केल्याच्या नोंदी दर्शविण्यात आल्या आहेत. मात्र उपरोक्त नियमांच्या तरतुदी प्रमाणे विहीत नमुन्यातील पावती संबंधितास प्रदान करण्यात आलेली नाही. पावती असावी संबंधितांनी ओपीडी नोंदवही व पटणी नोंदवही (जमा भरणा किर्दे) यात नमूद केलेल्या रुग्नांची नावे, सख्या व रुग्न प्रकार (नवाजुना) इत्यादी महत्वपूर्ण बाबींची अचुकता पडताळता आलेली नाही. [तरी नियमातील तरतुदी प्रमाणे फी रकमांची वसुली विना पावतीने होत असताना महानगरपालिकेने कोणत्या निकषावर फी रकमा उचित असल्याची खात्री करून रकमा स्विकृत केल्या या बाबत अनुपालन दर्शवावे. तसेच सत्वर नियमातील तरतुदी प्रमाणे वसूल होणाऱ्या फी सदर्भात संबंधितांना विहीत पावत्यांचे प्रदान करून त्या अनुषंगाने महानगरपालिकेस रकमा प्राप्त होतील याची नियमोचित दक्षता घ्यावी.

46	मनपा दवाखाना अंतर्गत नागरी आरोग्य केंद्रा (ओपीडी) कडून होत असलेल्या फी वसुलीतील अनियमितता.

सन 2011-2012 (म.न.पा. कालावधी) दवाखाना विभागाकडील बाह्य रुग्न सेवा (ओपीडी) वसुलात झालेल्या फीचा भरणा पटणी नोंदवहीशी (जमा कीर्दे) पडताळणी केली असता, खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 35 नुसार फी वसूल कर्ते यांनी वसूलात आलेल्या रोख रमांचा भरणा महानगरपालिका निधी तात्काळ करणे आवश्यक असून सदर रकमा बाबत आवश्यक ते नियंत्रण संबंधित विभागाने ठेवणे आवश्यक आहे. तथापी, अहवाला सोबतचे परिशिष्ट क्रमांक 9 मध्ये

उदाहरणादाखल मार्च 2012 या महिन्यातील नागरी आरोग्य केंद्राकडून वसूल केलेल्या ओपीडी फी ची रक्कम संबंधीत वसूल कर्त्यांनी 2 ते 15 दिवस विलंबाने महानगरपालिका निधीत केल्याचे आढळून आले आहे. वास्तविकता नियम 36 मधील तरतुदी प्रमाणे अर्थ विभागाने आरोग्य विभागा मार्फत भरणा न घेता थेट नागरी आरोग्य केंद्राकडून घेतल्याने सदरची अनियमितता झालेली आहे. याअर्थी आरोग्य विभाग व अर्थ विभाग यांचे सदरच्या नागरी आरोग्य केंद्रावर नियंत्रण नसल्याचे दिसून येते. याबाबत संबंधीतांची जबाबदारी निश्चीत होऊन उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे. व वसूल फी चा भरणा आरोग्य विभागा मार्फतच होण्याची दक्षता घेण्यात यावी.

2) खाली नमूद केलेल्या नागरी आरोग्य केंद्रांनी ओपीडी नोंदवही (बाह्य रुग्न तपासणी नोंदवही) विहीत नमुन्यात परिरक्षित केलेली नाही.

नागरी आरोग्य केंद्र क्रमांक - 3

नागरी आरोग्य केंद्र क्रमांक - 5

नागरी आरोग्य केंद्र क्रमांक - 6

3) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 40 व 78 नुसार फी वसूल कर्त्यांनी त्यांचा भरणा पटणी मध्ये वसूल रकमांचा मासिक व वार्षिक गोषवारे काढणे आवश्यक असताना तशी उचित कार्यवाही संबंधितांनी केलेली नसल्याने लेखा विभागातील जमा खतावणीशी योग्य ताळमेळ घेता आलेला नाही.

सबब, वरील अनियमितते बाबत अनुपालन होणे आवश्यक आहे.

---***---

47	मुद्रांकित पोच पावत्या व बिजके नसताना देयके पारीत झाले बाबत

मार्च 2012 मधील प्रमाणके पडताळणी केली असता, लेखा विभागाने विविध बाबींवरील खर्चाची देयके पारीत करून रकमा संबंधितांना प्रदान केल्याचे दर्शविले आहे. याबाबत उदाहरणादाखल तपशिल खालील प्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 19 नुसार प्रदान रकमांची संबंधिताकडून मुद्रांकित / पोचपावती प्राप्त करणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे पारीत होणाऱ्या देयकासोबत खर्चाची बिजके (बील) सादर केल्याशिवाय खर्चास मंजुरी देणे वित्तीय औचित्यास अनुसरून नाही. तथापि, तपशिलात नमूद केलेल्या खर्चाची प्रमाणके सोबत बिजके अथवा पोचपावत्या प्राप्त करून घेण्यात आलेल्या नसताना नियमबाह्यपणे रकमांचे प्रदान झाले आहे. यामुळे खर्चाची अचूकता पडताळता आलेली नाही. तरी देयके पारीत करताना नियमानुसार बिजके अथवा पोच पावत्या प्राप्त करून रकमांचे प्रदान होऊन याबाबत लेखा विभागाने योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब तपशिलातील खर्च रक्कम रुपये 264682/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशिल	प्रमाणकातील अपूर्णता
384	02/03/2012	7242	MH-34/8325 वाहनाचा विमा उतरविणे (न्यु इंडिया इन्श्युरन्स)	विमा पावती व मुद्रांकित पोच नाही.

438	13/03/2012	257440	संगणक साहित्य व इलेक्ट्रीक फिटींग	बिजक नाही.
	एकूण रक्कम	264682		

म.न.पा. निधी

आक्षेपाधिन रक्कम रुपये 264682/-

---***---

48	वाचनालय वर्गणी थकबाकी राहणे व इतर अनियमितता बाबत.

चंद्रपूर शहर महानगर पालिका अंतर्गत दोन सार्वजनिक वाचनालय कार्यरत असून वाचनालय निहाय सभासद संख्या व दिनांक 31/03/2012 अखेर वर्गणीदारांकडे वर्गणी थकबाकी बाबत ईकडील अर्धसमास पत्र क्रमांक 39 दिनांक 16/04/2014 नुसार मागणी करूनही माहीती संबंधिताकडून प्राप्त झालेली नाही. यामुळे खालील तपशिलात नमूद बाब नुसार एकूण आजीवन सभासद संख्या, मासिक सभासद संख्या व त्यांचे दर तसेच मार्च 2012 अखेर वर्गणी थकबाकीची रक्कम इत्यादी महत्वपूर्ण तपशिल नोंदविता आलेला नाही.

अ.क्र.	वाचनालय नांव	आजीवन सभासद संख्या	मासिक वर्गणी सभासद संख्या	मासिक वर्गणी दर	मार्च 2012 अखेर वर्गणी थकबाकी
1	माहात्मा वाचनालय	माहीती अप्राप्त			
2	हुतात्मा वाचनालय				
	एकूण				

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 122 नुसार थकबाकी वर्गणीदारांची मागणी नोंदवही विभागाने परिरक्षित केलेली नसल्याने सभासद निहाय थकीत रकमा, व कालावधी याची सत्यता पडताळता आलेली नाही. नियमानुसार नोंदवही अद्यावत ठेवून थकबाकीची परिगणना करून अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

2) दोन्ही वाचनालयाकडील आजीवन सभासदांची संख्या अभिलेखे अभावी पडताळता आलेली नाही. यामुळे यांचे कडून अनामत (ठेव) म्हणून रक्कम जमा झाली किंवा कसे याची सत्यता पडताळता आलेली नाही. महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 119(2) नुसार नमुना क्रमांक 88 प्रमाणे खाजगी व्यक्तींना सेवा पुरविण्यासाठी ठेवी या लेखा शिर्षा अंतर्गत स्वतंत्र नोंदवही परिरक्षीत करणे आवश्यक आहे.

3) वाचनालयाच्या अनामत रक्कम संदर्भात अभिलेख्या अभावी महानगरपालिकेचे अटळ दायित्व प्रमाणित करता आलेले नाही. तसेच सदर अनामतीच्या रकमांबाबत महानगरपालिकेने मतवणूकीचे धोरण स्वीकारले किंवा कसे याबाबतची सत्यता पडताळता आलेली नाही. तरी या बाबत अनुपालन दर्शवावे.

---***---

49	खाते प्रमुखाने विहीत नमुन्यात साठा नोंदवही (नमुना क्रमांक 1) परिरक्षित न केले बाबत.

महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 9(3) नुसार प्रत्येक खाते प्रमुखास त्याच्या आवश्यकते प्रमाणे मुल्यांकन साठा नोंदवहीसह जी पावती पुस्तके पुरविण्यात येतात त्या खाते प्रमुखाने त्याच्या अधिपत्याखाली नमुना क्रमांक 1 मध्ये विहीत नमुन्यात साठा नोंदवही ठेवावी व त्यात या नियमानुसार पावती पुस्तकाचा वापर विषयक नोंदीचे आवश्यक आहे.

तथापि, सन 2011-2012 करिता मालमत्ता कर व इतर कर, पी, किरकोळ वसुल इत्यादी करीता महानगरपालिकेने पुरविलेल्या पावती पुस्तकांची साठा नोंदवहीची पडताळणी केली असता, विभागाने उपरोक्त नियमानुसार नमुना क्रमांक 1 विहीत नमुन्यात साठा नोंदवही परिरक्षित केलेली नाही यामुळे मुख्यालय कडून विभागास प्राप्त झालेल्या पावती पुस्तकाचा वापर व नोंदी नियमातील तरतुदी प्रमाणे अद्यावत केल्याची खात्री पडताळता आलेली नाही. तरी तपशा परिक्षण कालावधी वसुन विभागाने साठा नोंदवही (नमुना क्र.1) परिरक्षित करुन पावती पुस्तकनिहाय उपरोक्त नोंदवहीत सक्षम प्राधिकारी यांचे कडून प्रमाणित करुन अनुपालन करणे नोंदवही सादर होणे आवश्यक आहे.

50	मालमत्ता कर धनादेशाने जमा करताना वठलेल्या दिनाकाची पावती न देणे बाबत.

मालमत्ता कर व इतर करांच्या जमा / वसुलात रकमांची पडताळणी केली असता, खालील तपशिलात नमुद केलेल्या (उदाहरणादाखल) मालमत्ता धारकांनी मालमत्ता कर रकमा धनादेशाने महानगरपालिकेकडे जमा केल्या आहेत. पावती पुस्तकातील नोंदी नुसार संबंधितांच्या रकमा ह्या आर्थिक वर्ष समाप्ती अखेर (दि. 31/03/2012) अत्यधीत महानगरपालिका खाती जमा झाले असल्याची संबंधितास दिनांक 31/03/2012 अखेरची पावती (नमुना क्र.49) प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच बँक विहीत नियमानुसार दिसून येत नाही. महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 24(2) नुसार धनादेशाची वसुली होणा या रकमांच्या मध्यांतरे सदर रकमा महानगरपालिका निधीत भरण्यात आल्या दिवशी (बँक खाती) जो दिनांकाच्या पावती देणे आवश्यक आहे. तथापि, तपशिला प्रमाणे वठलेल्या धनादेश जमा दिनांक व पावती दिनांक यात रकमांचे होत विहीत मुदतीत अनियमितता झालेली आहे.

अ.क्र	मालमत्ताधारक	वसुल केलेली धनादेशाने वसुल रक्कम पावती रक्कम	बँक खाती प्रत्यक्ष जमा दिनांक रक्कम	शेरा
1	किशोर माधव बेटे	121085/31-03-12 रु.37186	3/11-04-12 रु.37186	विहीत मुदतीत बाबे क्र.1(सी पडताळणी)

51	मुख्याधिकारी निवासस्थानाचे घरभाडे महानगरपालिका निधीतून अदा होणे बाबत,

दिनांक 20/10/2011 पासून चंद्रपूर शहर महानगरपालिका अस्तित्वात आली आहे. सदर कालावधीत (31/032012 अखेर पर्यंत) महानगरपालिकेने खालील तपशिलात दर्शविलेल्या प्रमाणे श्रीमती पद्मा पांडे, मुख्याधिकारी यांच्या निवासस्थानाचे घरभाडे दरमहा रुपये 6000/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 12000/- खर्च अदा केला आहे.

478	20/03/2012	6000	माहे फेब्रुवारी 2012
420	07/03/2012	6000	माहे जानेवारी 2012
	एकूण रक्कम	12000	

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) मुख्याधिकार यांना वेतनात घरभाडे भत्ता म्हणून नियमित वेतनातून रक्कम प्रदान होत असल्याने उपरोक्त प्रमाणे अदा केलेले घरभाडे खर्च नियमबाह्य ठरतो.

2) उपरोक्त नमूद घरभाडे दर रुपये 6000/- दरमहा कोणत्या निकषावर निश्चीत करण्यात आले, या बाबत लेखा परिक्षणात खात्री झालेली नाही.

3) घरभाडे संबंधितास प्रदान केल्याच्या मुद्रांकित पोच पावत्या लेखा परिक्षणात उपलब्ध झालेल्या नाही.

4) खर्च प्रमाणकर सोबत सक्षम अधिकाऱ्याचे महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971चे नियम 13 नुसार मंजुरी आदेश सादर केले नसताना देयके पारीत करण्याची अनियमितता झालेली आहे.

सबब, एकूण खर्च रक्कम रुपये 12000/- लेखापरिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

मनपा निधी

आक्षेपाधिन रक्कम रुपये 12000/-

***

52	विमा हप्ता रक्कम भरणा करणे बाबत

खालील प्रमाणे महानगरपालिकेने रक्कम रुपये 15442/- खर्च केलेला आहे.

प्र.क्र.	दिनांक	रक्कम	नाव	तपशिल
526	31/03/2012	15442	दि.न्यू इंडीया इन्श्युरन्स क.लि.	कमाल एन्श्युरन्स कोक्रीग सर्व्हीसेस प्रा.लि. नागपूर यांना धनादेश अदा दि.01/04/2012 ते 31/03/2013 चा वार्षिक हप्ता धनादेश क्र.657518 दि.31/03/2012
	एकूण रक्कम	15442		

याबाबत अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 25 नुसार सन 2011-2012 चे महानगर पालिका चे मंजुर अर्थसंकल्प सदर हाबी करीता आर्थिक तरतुद केल्याची खात्री झालेली नाही. यामुळे तरतुद नसताना खर्चाची अनियमितता झालेली आहे.

2) टेंडरची पाहणी केली असता, सदरचा विमा हप्ता हा कोणत्या विषयाचा / बाबीचा उल्लेख्यात आला व तो भरण्यासाठी एजन्सीची नेमणूक कोणी व कशी केली इत्यादी बाबत दे अभिलेखे सत्यता पडताळता आलेली नाही.

3) सदर विमा हप्ता मुळे महानगरपालिकेने कोणती फलश्रुती प्राप्त केली याबाबतचा खुलासा अधिकारी यांचा अभिप्राय उपलब्ध नसल्याने फलश्रुतीची सत्यता पडताळता आलेली नाही.

4) महाराष्ट्र नगर पालिका सेवा संहिता 1971 चे नियम 19 नुसार खर्चे रक्कम रु.15442/- ची मुद्रांकित पोहोच पावती घेण्यात आलेली नाही.

वरील खर्चे रक्कम रु.15442/- लेखा परिक्षणात आक्षेपार्हित ठेवण्यात येत आहे.

म.न.पा. निधी

आक्षेपार्हित रक्कम रुपये 15442/-

-----***-----

53	स्वच्छता निरीक्षक यांना गणवेश करीता कापड खरेदी करणे बाबत.

खालील तपशिलात नमूद केल्या प्रमाणे श्री.विजय मोरे, स्वच्छता निरीक्षक यांनी दिनांक 26/11/2011 रोजी पेटलेले अग्रीम रक्कम रुपये 21600/- चे समायोजन (खर्च) सादर केले आहे.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशील
416	02/03/2012	21600	9 स्वच्छता निरीक्षक यांना गणवेश करीता कापड खरेदी 54 मीटर @ रु.400/- प्रति मीटर प्रमाणे
	एकूण रक्कम	21600	

याबाबत अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.

1) स्वच्छता निरीक्षक यांना गणवेश करीता कापड पुरविणे बाबत तत्कालीन सभेर परिषद व तदनंतर महानगर पालिकेने शासना कडून उपलब्धी मंजूर करून घेतल्याचे आढळ होत नाही. त्यामुळे खर्चे रु.21600/- नियमबाह्यरित्या करण्यात आलेला आहे.

2) सन 2011-2012 चे महाराष्ट्रपालिकेच्या मंजूर अंदाजपत्रकात याबाबत तरतूद करण्यात आल्याचे आढळ होत नाही. महाराष्ट्र नगर पालिका सेवा संहिता 1971 चे नियम 25 नुसार तरतूद नसताना खर्चाची अनियमितता झालेली आहे.

3) सदर गणवेश कापडाची खरेदी शासन निर्णय दिनांक 02/01/1992 व मार्गदर्शक तत्वानुसार खादी ग्रामोद्योग भांडार या संस्थेतून खरेदी करावयाचे असल्याने श्री विजय मोरे, स्वच्छता निरीक्षक यांचा नावाने रुपये 21600/- अग्रीम रक्कम मंजूर करणे नियमबाह्य ठरते.

4) संबंधिताने समायोजनाचे देयक सादर करताना 54 मीटर कापडाची खरेदी केल्याचे, केल्या कोणी व संबंधितांना प्रत्येकी किती कापड देण्यात आले इत्यादी महत्वपूर्ण बाबींचा कोणताही तपशील सादर केलेल्या नसल्याने समायोजन कोणत्या निकषावरुन मान्य करण्यात आले याची सत्यता पडताळता आलेली नाही.

5) संबंधित स्वच्छता निरीक्षकांना गणवेश कापड प्रदान होऊन त्यांनी त्यापासून गणवेश तयार करून

वापरात आणल्याची फलश्रुती लेखा परिक्षणात पडताळता आलेली नाही.

सबब, खर्च रक्कम रुपये 21600/- लेखा परिक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

म.न.पा. निधी

आक्षेपाधिन रक्कम रुपये 21600/-

---***---

54	उपार्जित पध्दतीवर आधारीत व्दीनोंद पध्दतीने लेखे ठेवणे बाबत.

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.लेखास 10/2004/71 प्र.क्र.-5/04 निवि-3 दिनांक 06/07/2005 नुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिनांक 01/04/2005 पासून उपार्जित पध्दतीवर आधारीत व्दीनोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करावयाची आहे.

चंद्रपूर महापालिकेने सन 2011-2012 व 2012-2013 चे लेखे व्दीनोंद पध्दतीने संनदी लेखापालाकडून तयार करून घेण्यात आल्याचे महानगरपालिकेने ईकडील अर्धसमास पत्र क्र.3, दिनांक 17/02/2014 नुसार मानविण्यात आलेल्या खुलाशात नमूद केलेले आहे.

व्दीनोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करतांना सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी पुर्वीची रोख तत्वावर लेखा ठेवण्याची पध्दती व व्दीनोंद लेखा पध्दती या दोन्ही पध्दतीत स्वतंत्र लेखे ठेवावयाचे आहेत. व्दीनोंद लेखा पध्दतीने लेखे व्यवस्थीत ठेवणे शक्य आहे अशी महानगरपालिकेची खात्री झाल्यास मा.आयुक्त तथा संचालक, नगरविकास संचालनालय यांचे सहमतीने व्दीनोंद लेखापध्दती पूर्णपणे कार्यान्वित करण्यात यावी अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

दिनांक 06/07/2005 च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार राज्य लेखा संहिता तयार होईपर्यंत राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिकेचा वापर करावयाचा असून राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियम पुस्तिका 2004 मधील परिच्छेद 31.4 मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ताळेबंद, आप-व्यय पत्रक, रोख प्रवाह (Cash-Flow) पत्रक, जमा व खर्च पत्रक, लेख्यावरील टिपण्णी, वित्तीय फल निदेशक इत्यादी वित्तीय लेखे तयार करावयाचे आहेत. चंद्रपूर महानगरपालिकेने व्दीनोंद पध्दतीने लेखे ठेवण्यास सुरुवात केली आहे. मात्र अद्याप पावेतो सदर कार्यपध्दतीची पूर्णपणे अंमलबजावणी केलेली नाही. याबाबतीत सत्वर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

---***---

55	सन 2011-2012 करीता मुख्य लेखा परिक्षक यांनी अहवाल सादर केला नसले बाबत.

मुख्य लेखा परिक्षक यांनी सन 2011-2012 या आर्थिक वर्षाच्या समाप्ती नंतर महानगरपालिकेच्या संपूर्ण लेख्यावर आपला अहवाल तयार करून स्थायी समितीस सादर करणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 106(3) नुसार बंधनकारक असतांना देखील अद्याप पावेतो तसा अहवाल तयार करून स्थायी समिती समोर सादर केलेला नाही. यामुळे सदरच्या वित्तीय वर्षात महानगरपालिकेच्या संपूर्ण लेख्यामध्ये गंभीर उणिवा अथवा अनियमितता झाल्या किंवा कसे याबाबतची अयुक्तता मुख्य लेखा परिक्षक यांच्या अभिप्राया अभावी पडताळता आलेली नाही. तसेच उपरोक्त कलमातील तरतुदी नुसार उचित कार्यवाही

होत नसल्याचे आढळून आले आहे. तरी नियमावली तरतुदी नुसार वेळीच आवाज तयार होऊन स्थायी प्रणाली समोर सादर होईल या बाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी. व सन 2011-2012 चे अहवाल तयार होऊन स्थायी समिती समोर सादर केल्याचे अनुपालन दर्शवावे.

56	दिनांक 31 मार्च 2012 नंतर वसुलात आणलेल्या रकमा त्याच दिनांकास प्राप्त दर्शविण्याची अनियमितता.

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 32 व 51 (1)(2) नुसार रोज येणारी रोकडजमा अथवा वसुली त्याच दिवशी रोकडवहीत जमा करून पावितकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने रोकडवहीतील लेखे त्याच दिवशी बंद करणे आवश्यक आहे. तथापि, खालील तपशिलातील रकमा ह्या 31 मार्च नंतर वसुलात आलेल्या असताना त्या 31 मार्च 2012 मध्ये जमा दाखवून लेखे बंद केल्याचे आढळून आले आहे. तरी सदरच्या रकमा 31 मार्च च्या तारखेत जमा दाखविण्याचे प्रयोजनासह अनुपालन सादर होणे आवश्यक आहे व तसी जबाबदारिश्चाची खात्री पटवावी.

रोकडवहीतील दिनांक	जमा दाखविलेली मालमत्ता कराची एकूण रक्कम	मालमत्ता कराच्या रकमेचा प्रत्यक्ष वसुलात आलेला दिनांक	चलन नंबर व दिनांक
31/03/2012	242114	01/04/2012	1260/01-04-2012
31/03/2012	354862	02/04/2012	1261/02-04-2012
31/03/2012	318384	03/04/2012	1262/03-04-2012

57	एकत्रित मालमत्ता कर सोडण्या प्रमाणावर थकीत असणे बाबत.

एकत्रित मालमत्ता कर व त्या अनुषंगाने कर वसुली बाबत पडताळणी केली असता, सन 2011-2012 (महापालिका कोलमडली) वर्ष अखेरीस कर संकलन विभागाने पुरविलेल्या माहिती नुसार लेखा अहवाला सोबतचे विवरणपत्र क्रमांक मध्ये नमूद केलेल्या प्रमाणे एकूण मागणी रक्कम रुपये 10,82,15,120/- पैकी रक्कम रुपये 7,53,04,621/- वसूल झाली असून रुपये 3,21,10,499/- इतकी कराची रक्कम थकीत आहे. सदर वसूल रक्कमेची ही 69.59% (टक्के) असून वसुलीचे प्रमाण सदरच्या आर्थिक वर्षात अत्यल्प झाल्याने महापालिकेच्या अपेक्षित उत्पन्नात तूटची परिस्थिती होऊ शकलेली नाही.

खालील उपाय योजना न केल्याने रक्कम थकीत राहण्याच्या प्रवृत्तीत वाढ झाल्याने लेखा परिक्षणात आढळून आले.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका 1949 मधील अनुसूची ई मधील कलम 39 नुसार मालमत्ता कर देय झाल्या बरोबर महापालिकेने कोणताही विलंब न लावता ताबडतोब कर भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीसदेय

कराची मागणी करणारे देयक (बील) संबंधितास सत्वर देण्याची आवश्यकता आहे. मात्र सन 2011-2012 मध्ये तशी उचित कार्यवाही नुसार तात्काळ मागणी देयके संबंधीतास वाटप झालेले नाही. त्याचा परिणाम एकूण वसुलीवर झालेला आहे.

2) अहवालासोबतचे विवरणपत्र क्रमांक 4 मध्ये दर्शविलेल्या थकीत मालमत्ता कराच्या रकमा हया ब-याच कालावधीपासून प्रलंबित असल्याने थकबाकीत प्रचंड वाढ झाल्याची दिसते. तथापि, विभागाने अधिनियम 1949 चे प्रकरण 11 कलम 128 नुसार कर वसुली साठी थकबाकीदारावर वेळीच ठोस अशी कार्यवाही केली नसल्याने सदरच्या थकीत रक्कमेत वाढ होऊन त्याचा परिणाम महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नावर झालेला आहे.

3) अधिनियम 1949 मधील अनुसूची -ड मधील प्रकरण 8 चे कलम 41 नुसार 31 डिसेंबर नंतर अप्राप्त कराच्या रकमावर दोन टक्के शास्तीची रक्कमेची (दरमहा) आकारणी न केल्याच्या अनियमिततेमुळे शास्तीची जरब मालमत्ता धारकावर न बसल्याने त्याचाही परिणाम मालमत्ता कर वसुलीवर झालेला आढळून आला येतो.

उपरोक्त बाबी पाहाता कर विभागाने कराची मागणी व वसुलीची कार्यवाही अधिनियमातील तरतुदी प्रमाणे सत्वर करणे आवश्यक आहे. व मोठ्या प्रमाणावर असलेल्या थकीत रकमाचे मालमत्ता धारकांवर अधिनियमातील तरतुदी प्रमाणे नियमोचित कार्यवाही करून रकमा वसुलीची कार्यवाही करून रकमा थकीत राहणार नाही याची योग्य ती दक्षता घेऊन उपाय योजना करणे आवश्यक आहे.

माहे मार्च 2012 अखेर थकीत मालमत्ता कराची रक्कम रुपये 3,29,10,499/- वसुल करून अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

वसुलपात्र रक्कम रुपये 3,29,10,499/-

***

58	सक्तीचे व ऐच्छिक करांची वसुली न करण्याच्या अनियमिततेमुळे होत असलेल्या आर्थिक नुकसानी बाबत

कर विभागाकडील एकत्रित मालमत्ता कर आकारणी नोंदवही व मागणी नोंदवहीची पडताळणी केली असता, नगरपालिका व तदनंतर महानगरपालिका अस्तीत्वात आल्यापासून महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता धारकांकडून मालमत्तेच्या वार्षिक भाडे मूल्यानुसार सक्तीचे व ऐच्छिक कर अनुक्रमे मलप्रवाह, विशेष स्वच्छता, तसेच दिवाबत्ती व मलनिस्सारण इत्यादी सारखे कराची वसुली कर संकलन विभागाकडून केली जात नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे महानगरपालिकेस या कराच्या रूपाने मोठ्या आर्थिक उत्पन्नवाढी पासून वंचित रहावे लागत आहे. वास्तविकता मुंबई महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 127 मधील तरतुदीनुसार सक्तीचे व ऐच्छिक कराची वसुली होणे अपेक्षित होते. तथापि, महानगरपालिके कडून सदर कराबाबतच्या सेवा मात्र महापालिका हद्दीतील मालमत्ता धारकांना पुरविल्या जात असल्याने सदर सेवेवर महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणात आर्थिक झुदेड सहन करावा लागत असताना देखिल महानगरपालिकेने उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार नियमोचित कार्यवाही न करण्याची अनियमितता केली आहे.

तरी महापालिकेच्या आर्थिक उत्पन्न वाढीसाठी सदरचे सक्तीचे व ऐच्छिक कर जे महानगरपालिकेकडून वसुल केले जात नाही अशा कराच्या वसुलीसाठी नियमोचित कार्यवाही करून त्याबाबतचे अनुपालन लेखा परिक्षणास होणे आवश्यक आहे.

***

59	एकत्रित मालमत्ता पटणी नोंदवही व मध्यवर्ती भरणा पटणी नोंदवहीत मासिक व वार्षिक गोषवारे नोंदविलेले नसले बाबत

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 58 व 78 मधील तरतुदी नुसार सन 2011-2012 अखेर खालील तपशिलात उदाहरणादाखल नमूद केल्याप्रमाणे एकत्रित मालमत्ता पटणी नोंदवहीत (नमुना क्र.50) कर निहाय एकूण जमा वसुली व त्याची बेरीज या प्रमाणे महिना निहाय तेरीज नमूद केलेली नसल्याने व त्या अनुषंगाने वार्षिक गोषवारे (महिना निहाय) नोंदविलेले नाहीत तसेच तपशिलात नमूद असल्या व्यतिरीक्त पटणी नोंदवहीतील गोषवारे हे प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केलेले नसल्याने लेखा विभागाकडील दर्शविलेल्या कराच्या रकमाशी ताळमेळ घेता आलेला नाही.

तरी, रकमांचा ताळमेळ घेऊन मासिक व वार्षिक गोषवारे प्रमाणित करून अनुपालन सादर करावे. ✓

अ.क्र	एकत्रित मालमत्ता पटणी नोंदवही क्रमांक (प्रभागनिहाय लिपीकाचे नांव)	प्रभागाचे नांव
1	श्री. जयवंत पतरगे	हिरलाज भवानी वाडे
2	श्री. श्याम बोगलकर	बाबुपेठ वाडे
3	श्री. मोटेफोडे	चांदा रय्यतवाडी कॉलरी
4	श्री. बुटले	जलनगर वाडे क्र.1, जटपुरा नं.1 व 2
5	नांव नमूद नाही	महाविनकर वाडे, इंदिरानगर, लालपेन्ट वे.
6	नांव नमूद नाही	सिरहील वाडे नं.2, सराय वाडे
7	श्री. अरुण कुलमेश	बाजाली वाडे नं. 1 व 2
8	श्री. संजय बनकर	गंजवाडे भानापेठ, हॉस्पीटल वाडे
9	श्री. भाऊराव अमृतकर	शामनगर, आनंदनगर
10	श्री. अशोक जयाडे	एम.ई.एल. वाडे
11	मुहम्मद फैज	अंचलेश्वर वाडे 1,4,5
12	श्री. प्रभाकर भाले	दादमहल वाडे नं.1,2 समाधी वाडे-2
13	श्री. शैय्या चवरे	जटपुरा वाडे नं.3,4,5

60	मालमत्ता कर मागणी नोंदवह्या मधील गंभीर अनियमितता

चंद्रपूर महानगरपालिकेचे सन 2011-2012 करीता एकत्रित मालमत्ता कराच्या मागणी नोंदवह्यांची पडताळणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

1) मागणी नोंदवह्यामध्ये प्रत्येक नोंदवहीत किती पृष्ठये आहेत याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र नोंदविण्यात आले नाही.

2) वसुलात आलेल्या मालामत्ताकरांच्या रकमा पावती पुस्तकावरील छापील क्रमांकानुसार नमूद नसून कर विभागाने स्वतः दिलेल्या हस्तलिखीत क्रमांकानुसार नमूद असल्याने सदरच्या वसुलातील रकमांची सत्यता

वसूलपात्र असली नाही. वास्तविकता महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 च्या तरतुदी नुसार वसूली पुस्तकातील छापील रकान्यामध्ये बदल करण्याबाबतची कोणतीच तरतुद नसताना कर विभागाने स्वतःच स्वतंत्रपणे क्रमांक नोंदवून छापील रकाने बदलण्याची अनियमितता केली आहे.

3) केंद्रीय शिक्षण कर, केंद्रीय सेवा कर, केंद्रीय उच्च शिक्षण कर इत्यादी मागणी नोंदवहीत आढळून येत नाही. मात्र मागणी पुस्तकातील नमुद उपरोक्त कर वसूल करण्याचे दिसते, परंतु मागणी नोंदवहीत वसूली असल्याची नोंद घेतलेली येत नाही.

4) चालू आर्थिक वर्षाच्या मागणी नोंदवहीत सन 2010-2011 मधील थकित राहीलेल्या मालमत्ता कराच्या रकमा अचूक व बरोबर पेतल्याचे दिसून येत नाही. त्या नोंदविताना कमी रकमेने अथवा कमी केल्या आहेत. तसेच काही मालमत्ता धारकांची नावे चालू मागणी नोंदवहीतून कमी केल्याची तसेच अनियमितता केल्याचे दिसते. वास्तविकता, महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 76 मधील तरतुदी प्रमाणे मागणी नोंदवहीतील कोणत्याही बदलास संक्षम अधिकारी यांच्या आदेशाविना दुरुस्ती करता येत नाही. व ती करावयाची असल्यास योग्य त्या नोंदी साक्षांकित करणे बंधनकारक आहे. तसेच नियम 75(7) नुसार मागणीतील प्रत्येक बदलाची नोंद नमुना 46 मधील बांड घट नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. मागणी नोंदवहीतील रकमा परस्पर कमी रकमेने नोंदवून अथवा कमी केल्याने महानगरपालिकेचे कायमस्वरुपी आर्थिक उत्पन्नाचे नुकसान झाले आहे. मागणी नोंदवहीतील नोंदी नियमानुसार अचूक व बरोबर नोंदविल्या जातील याची दक्षता घेणेत यावी.

5) मागणी नोंदवही ही नमुना 47 नुसार विहित नमुन्यात नोंदविलेले नाहीत उदा. मागणी नोंदवहीत मालमत्तेचे वार्षिक भाडे मूल्य (कर निर्धारणानुसार) शासकीय, नोंद नसणे, सरकारी करांची नोंद नसणे, जसे केंद्रीय शिक्षण कर, केंद्रीय सेवा कर, केंद्रीय उच्च शिक्षण कर इत्यादी करांची नोंद नसणे स्थानिक नोंदी सारखी वसूलात असलेल्या मालमत्ता करांची सत्यता पडताळता येत नाही.

6) नियम 76 मधील तरतुदीनुसार मागणी नोंदवही निहाय नमुद नोंदी अचूक असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सन 2011-2012 करीता सर्वेक्षकांनी प्राप्त करून घेतले नसल्याने मागणी नोंदवहीतील नोंदी इतिहत व अचूक असल्याची सत्यता प्रमाणित करता येत नाही.

7) सन 2011-2012 करीता मागणी नोंदवहीतील प्रत्येक पानावरील वेरीज हया पेन्सीलने नोंदविल्या आहेत. त्या प्रकाशनगर वाडे, प्रभा अपार्टमेंट वाडे, हिम्मतराज मेवाती वाडे, इत्यादी वास्तविकता नियम 76 मधील तरतुदी नुसार सदरच्या वेरजा हया शाईच्या पेनाने (कायमस्वरुपी) घेऊन एकत्रित गोषवारे काढणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही केलेली नसल्याने सन 2010-2011 मधील थकबाकी राहीलेल्या रकमा अचूक व बरोबर सन 2011-2012 च्या नोंदवहीत नोंदविण्यात आल्या किंवा कसे व चालू वर्षातील वसूल पात्रतेची व वसूल पट्टणी नोंदवही नुसार प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या रकमा नोंदवून त्या अखेरीस अचूक थकबाकी नोंदविली किंवा कसे या महत्वपूर्ण बाबींची सत्यता गोषवारे उपलब्ध नसल्याने पडताळता आलेली नाही. वरील अनियमितते मुळे सन 2011-2012 मध्ये कोणत्याही प्रकाराचा संबंधितांकडून गैरप्रकार झाल्यास त्याला जिल्हाधिकारी धरु शकणेची नाही. त्यामुळे अचूक गोषवारे नोंदवून रकमा प्रमाणित घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे मागणी नोंदवहीत (सन 2011-12) गंभीर स्वरुपाच्या अनियमितता आढळून आलेल्या आहेत. नियमानुसार मागणी नोंदवहीमध्ये अचूक आकडेवारी नोंदविणे व पर्यायाने महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीसाठी उपाय योजना होणे महानगरपालिकेच्या आर्थिक हितासाठी आवश्यक आहे.

61	अल्पसंख्याक निधी अंतर्गत केलेल्या बांधकामातील अनियमितता बाबत

मार्च 2012 अखेर तत्कालीन नगर पालिका कालावधीत अल्पसंख्याक निधी (शासकीय) अंतर्गत मंजुर असलेली कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे. सदर कामावर एकूण रक्कम रुपये 1497496/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

क्र.क	कामाचे नाव	खर्च तपशील			
		प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशील
1	महाकाली कॉलरी येथील कब्रस्थान येथे पेव्हर्ड टाईल्स रस्ता बांधकाम करणे	1	31/03/2012	473252	रमेश ठाकरे, प्रथम व अंतिम देयक 43/75 अ.प. रक्कम 451845 अदा खर्च 21407/-
2	पुटकाम कब्रस्थान येथे टाईल्स रस्ता बांधकाम करणे	2		385345	सनिक्षा कन्स्ट्रक्शन, प्रथम व अंतिम 43/70 अ.प. रक्कम 363442/- अदा खर्च -22903/-
3	पठाणपुरा कब्रस्थान येथे उर्वरीत संरक्षण भिंतीचे काम	3		637899	मे.आर्य सहयो कन्स्ट्रक्शन, चंद्रपूर 43/77 अ.प.रक्कम 649186/- अदा खर्च
			एकूण रक्कम	1497496	1464473

वरीलबाबत अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन, अल्प संख्यांक विभाग, शासन निर्णय क्रमांक अनिवि-2010/प्र.क.105/का-7 दिनांक 15/09/2011 अन्वये परिशिष्ट 'अ' मधील अनुक्रमांक 3 कामाकरीता एकूण रक्कम रुपये 1500000/- मंजुरी देण्यात आली असून, कलेक्टर, चंद्रपूर यांचे आदेश क्र. दिनांक 31/03/2011 अन्वये अनुदान रु.1500000/- तत्कालीन नगर परिषदेस वितरीत करण्यात आला. त्यानुसार तदर्थत्व नगरिनगम महानगरपालिकेने सादर कामावरील एकूण खर्च रुपये 1497496/- संबंधित मक्तेदारास अदा करण्यात आले. तसेच काम निहाय मंजुर अंदाजपत्रके पडताळता मक्ता 1 व 2 कामनिहाय खर्च मंजुर प्राकलना पेक्षा जादा खर्च झाला असून सदर खर्च रु.44310/- उपलब्ध झालेला अनुदानातून आवश्यकतेनुसार अनियमितरित्या झालेली आहे. जादा खर्च रक्कम महानगरपालिका निधीतून वसुल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/07/06/ प्र.क.94/इमा-2 दिनांक 16/11/2006 नुसार रक्कम रुपये 15 लक्ष पर्यंतची बांधकामे ही बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत मंजुर मक्तेदारांचे यादी मधील बेरोजगार अभियंता यांनी देणे बाबत सूचना असून अशी मक्तेदारांकडून मक्तेदारी करणे ही महाराष्ट्र प्रादेशिक व नगर विकास विभागाचे परिपत्रक दिनांक 20/01/1993 नुसार नमुद मार्गदर्शक सूचना नुसार शासकीय निमशासकीय संस्थांना ना.प. नी प्राधान्याने कामे देण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. मात्र अशी अमलबजावणी विभागाने निविदा प्रक्रीया करणे व मक्तेदार निश्चीत करणे (अत्यल्प दर धारीत),

नियमबाह्य ठरते. तसेच योजना राबविण्यात यामुळे नाहक काल अपव्यय झाल्याने योजनेचा सत्वर लाभ झालेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, अल्प संख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अविवि-2009 / प्र.क्र.43/09 का-1 दिनांक 09/02/2009 मधील परि.क्रमांक 4 चा 3(अ) नुसार न.पा. चे कार्यक्षेत्रात किमान 10 टक्के अल्पसंख्यांक (मुस्लीम, ख्रिश्चन, बौध्द, जैन, शीख व पारशी) लोकसंख्या असणे आवश्यक आहे. व तसे म.जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे कक्ष अधिकारी, अल्प संख्याक विकास विभाग यांचे पत्र अविवि-2009/10/प्र.क्र. 235/का-7 दिनांक 30/10/2009 मधील 3(अ) नुसार सूचित केले आहे. तथापी याबाबत प्रमाणपत्र अभावी लोकसंख्येच्या टक्केवारीची सत्यता पडताळता आली नसल्याने योजने अंतर्गत झालेल्या कामाच्या खर्चाची उचित लेखा परिक्षा करता आलेली नाही.

4) शासन निर्देशा नुसार मक्तेदाराने शासकीय विमा निधी संचालनालय यांचे कडून विमा पत्र घेतलेले नसल्याने प्रत्येक कामाच्या देयकातून 1 टक्के दराने एकूण रक्कम रुपये 14975/- (4733+3863+6379) वसूल होणे आवश्यक असून संबंधित संचालनालयाकडे रक्कम भरणा करून अनुपालन दर्शवावे.

उपरोक्त अनियमिततेमुळे एकूण खर्च रक्कम रुपये 1497496/- खालील प्रमाणे असान्य करण्यात येत आहे.

अल्प संख्याक विकास निधी(शासकीय योजना)

आक्षेपाधिन रक्कम रुपये 1453186/-

वसुलपात्र रक्कम रुपये 44310/-

एकूण रक्कम रुपये 1497496/-

(मुद्दा क्र.4) वसुलपात्र रक्कम रुपये 14975/-

***

62	आरोग्य विभागा अंतर्गत नागरी आरोग्य केंद्रे तपासणी कालावधीत (ओपीडी सेवा) बंद असले बाबत.

आरोग्य विभागा अंतर्गत दवाखाना निहाय ओ.पी.डी. नोंदवही (बाह्य रुग्ण सेवा) पडताळणी केली असता, नागरी आरोग्य केंद्र क्रमांक 6 (विवापूर आरोग्य केंद्र) चे ओ.पी.डी. नोंदवही मध्ये दि.16/02/2012 चे नंतर दि.01/03/2012 रोजी ओ.पी.डी. सेवा सुरू झाल्याचे आढळते वास्तविकता, विभागाने पुरविलेल्या माहीतानुसार आठवड्याचे दोन दिवस (सोमवार, गुरुवार) हे बाह्य रुग्ण सेवा तपासणी करीताच राखीव आहेत. यामुळे दिनांक 17/02/2012 ते 28/02/2012 या कालावधीत सदर केंद्रातून कोणतीही बाह्यरुग्ण तपासणी सेवा नागरीकांना संबंधितांनी उपलब्ध करून दिल्याचे आढळ होत नाही. तसेच खालील तपशिलात नमूद इतर नागरी आरोग्य केंद्राची ओ.पी.डी.सेवा तपासणी करीता राखीव असलेल्या तारखांच्या दिवसाचा ओ.पी.डी फी चा भरणा लेखा शाखेकडे प्राप्त झालेला नसल्याने सदर कालावधीत ओ.पी.डी. सेवा बंद असल्याचे आढळून आले आहे.

नागरी आरोग्य केंद्र क्रमांक	तपासणी सुरु असलेल्या रात्रीच (सोमवार व गुरुवार) दिवसाच्यामध्ये तरखाना ओपीडी सेवा बंद असल्याचा तपशील			उपरोक्त कालावधीतील ओपीडी सेवेसाठी रात्रीच असलेल्या तारखा
	पासून	पर्यंत	एकूण बंद कालावधी	
01	01/03/2012	14/03/2012	14 दिवस	(1, 5, 8, 12)
	16/03/2012	28/03/2012	13 दिवस	(19, 22, 26)
03	03/03/2012	12/03/2012	10 दिवस	(5, 8, 12)
05	13/03/2012	30/03/2012	18 दिवस	(15, 19, 22, 26, 29)
07	20/03/2012	30/03/2012	10 दिवस	(22, 26, 29)

तरी सदर कालावधीत बाह्य रुग्ण सेवा सुरु ठेवी किंवा करुरे यांनाकायी मंजूरता लेखा परिक्षणात पडताळणी करणेत यावी. सदर कैटागुन (आ.के.क्र.6 व परिशिष्ट नमुद असलेले) नमुद कालावधीत कोणतीही सेवा पदान न होणेबाबी नेमकी खरी लेखा परिक्षणास न झाल्याने या बाबत अनुपालन होणे आवश्यक आहे.

63	अतिरीक्त पदावरील वेतन व भत्ते खर्चातील अनियमितता

मा.संचालनालयाचे आदेश क्र. मपापप्र-2005/प्र/32, सीएच/1/प्रसविका पदनीव/क्र.877/2005/का-24, दिनांक 17/12/2005 नुसार तत्कालीन चंद्रपूर नगरपरिषदेवरील आस्थापना अंतर्गत संवर्ग निहाय पदांना आकृतीबंध नुसार मंजुरी प्रदान केलेली आहे. त्याआधारे ईकडील आदेशनामा पत्र क्र. 27 दिनांक 03/04/2014 अन्वये चंद्रपूर महानगरपालिकेने माहे 2012 अखेर सादरचे आस्थापना विभागाकडील प्राप्त माहिती नुसार खालील प्रमाणे वाहन चालकांच्या मंजूर व कार्यरत पदाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

संवर्गनिहाय पदनाम	मंजूर पदे		कार्यरत पदे		अतिरीक्त पदे व त्यावरील वेतन व भत्ते खर्च
वाहन चालक	02	06	02	11	05 रु.434980=00
				एकूण रक्कम	रु.434980=00

याबाबत खालील प्रमाणे अतिरिक्त ठरण्याचा मेळ आहेत.

1) मा.संचालनालय, मुंबई यांचे उपरोक्त संदर्भीय आदेश दिनांक 17 डिसेंबर, 2005 चे सुधारीत आकृतीबंधा नुसार वाहन चालकाचे स्थायी व अस्थायी असे एकूण 8 मंजूर पदे असताना तत्कालीन चंद्रपूरमहानगरपालिकेने त्याव्यतिरीक्त एकूण 5 वाहन चालकांची पदे अतिरीक्त ठरलेली असल्याने सदरचे 5 अस्थायी पदावरील वेतन व

अनियमितता झाल्या मुद्दे तत्कालीन उपायुक्तांच्या व सध्याच्या सहायक आयुक्तांकडे मांडला जातो. सदरची बाब ही निदर्शनास आणून देणारी अनियमितता दर्शविणारी आहे.

2) सुधारित मजूर पट्टया आकृतीबंध हा 6 वर्षे पर्यंत तीन सहत आणून सदर आकृतीबंधाची मुदत संपलेली आहे. पुढील महापालिका आस्थापना अंतर्गत आकृतीबंध मजूरी साठी प्रस्ताव सादर करताना अतिरीक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांना समावेश पेऊन ही पदे सादर करणे गरजे होते. प्रस्ताव सादर करून पुढील आकृतीबंध मंजूर करून घेणे. तसेच पदे आवश्यक आस्थापना खर्चाचे विहीत मर्यादेपेक्षा जादा खर्चे होणार नाही याची दक्षता घेवून पुढील आकृतीबंध मंजूर करावा. ही पदांची वरील अतिरिक्त पदांवरील वेतन व आस्थापनेचे सुधारे रक्कम रुपये 4,34,980/- महिन्याचे वेतनात येत आहे.

म.न.पा. निधी

अतिरिक्त रक्कम रुपये 4,34,980/-

---

64 | कालबद्ध पदोन्नतीचा लाभ देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची प्रकरणे तसेच पूर्णवेळ कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके तपासणी साठी सादर न केले बाबत.

महापालिका / महापालिकेत कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवाप्रवेश आश्वासित प्रगती योजना / आश्वासित प्रगती योजने अंतर्गत कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात आलेला आहे. ईकडील आदेशाचा पत्र क्रमांक 405 दिनांक 22/04/2014 नुसार कालबध्द पदोन्नतीचे आदेश. वेतन निश्चीती विवरणपत्रे तुटवाही सह कालबध्द पदोन्नतीचे प्रकरणे तसेच महाराष्ट्रातील कार्यालयातील कार्यरत पुर्ण वेळ कर्मचाऱ्यांची मुळ सेवा पुस्तके सेवा परिक्षणास तपासणीसाठी सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यापैकी सेवापरिक्षण कालबध्दचे ही प्रकरणे व मुळ सेवापुस्तके तपासणीसाठी सादर करण्यात आले नाहीत. ती सादर होणे आवश्यक आहे. पुढील सेवा परीक्षणात याबाबत दखल घेण्यात यावी.

---

65 | निविदा जाहीरात प्रसिध्दी खर्ची बाबत

आलेल्या नमुद प्रमाणकानुसार रकमेचे खुलाश्यात प्रसिध्द झालेल्या निविदा जाहीरातीचा खर्चे रुपये 8280/- अदा करण्यात आलेला आहे.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशील
490	28/03/2012	5400	दैनिक सामना दि.21/01/2012 बांधकाम विभाग निविदा प्रसिध्दी खर्चे आदेश 3 कॉलम 15 से.मी बीजक 12 कॉलम 15 से.मी चे 3x15= 45x30 =1350 12x15=180x30=5400

			जादा खर्च 4050
491	28/03/2012	2880	दैनिक महाविदर्भ दि.20/01/2012 अदा रक्कमेचे संदर्भात शासनाचे मजुर दर जोडलेले नाहीत
	एकूण	8280	

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे

1) प्रमाणक क्रमांक 490 नुसार अदा 5400/- मध्ये बांधकाम विभागाचे आदेश 3 कॉलम 15 से.मी. आकाराच्या जाहीरातीचे असताना त्याना रु.1350/- देय होते. मात्र संबंधित वृत्तपत्राने सादर केलेल्या बीजका नुसार 12 कॉलम 15 से.मी.आकाराचे निविदा जाहीरातीचे रु.5400/- अदा झाले आहेत. आदेशा प्रमाणे जाहीरातीचे काम देय असल्याने जादा खर्च रु.4050/- लेखा परिक्षणास अमान्य आहे

2) दैनिक महाविदर्भ या वृत्तपत्राकरीता शासनाने मजुर केलेले जाहीरात दर देयका सोबत सादर केले नसल्याने संबंधित वृत्त पत्राकरीता शासनाचे दर मजुर असल्याची खात्री झालेली नाही.

सबब, खर्च एकूण रक्कम रुपये 8280/- लेखापरिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे

म.न.पा. निधी

आक्षेपाधिन रक्कम रुपये 8280/-

—***—

66	वाहन लेख्यातील अनियमितता

सन 2011-2012 करीता (मनपा कामावाचे) करीता महापालिकेने कडील खाली नमूद केलेल्या वाहनाच्या इतिवृत्त/लॉगबुक (वाहन लेखा) नोंदवहीची पडताळणी केली असता, खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

वाहन क्रमांक	
MH-34A/7030	MH-34/7027
MH-34/7031	MH-34/7491
MH-34A/395	MH-34/6334
MWY-3130	MH-34/4885

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) उपरोक्त वाहनाच्या इतिवृत्त/लॉगबुक (वाहन लेखा) नोंदवहीची पडताळणी केली असता, त्यामधील रकाना क्रमांक 7 व 8 मध्ये वाहन दररोज किती किलोमीटर धावले याच्या नोंदी घेण्यात आलेल्या नसल्याने इंधन वापराबाबत सत्यता पडताळता येत नसल्याने मर्यादा पेक्षा जास्त इंधन लागत असल्याची शक्यता आहे. वाहनाचे कि.मी. ची नोंद नसल्याने वाहन रोज किती किलोमीटर धाव घेते याचा अंदाज करता बांधला जाते याबाबत अचुकता प्रमाणित करता येत नाही.

2) वाहन वापर नोंदवहीत महिना अखेर इंधन वापराचे मासिक व वार्षिक शोषवार काढलेले नाहीत त्यामुळे वाहन किती धावले, किती इंधन खर्च झाले व त्यानुसार वाहन एका लिटर मध्ये सरासरी किती धावले इत्यादी

कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली नाही.

3) अवर सचिव यांचेकडील दि.[illegible] (वाहन तेरा नोंदवही) वाहन तपासणी या कार्यालयातील अधिकारी यांच्या प्रभारातील वाहने तपासणी अहवालाचे तसेच रजिस्टर क्रमांक 14 मध्ये प्राधिकृत अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नसल्याने तसेच वाहन तपासणी कामी अत्यंत महत्वाचा स्वरूपाचा असलेल्याने वाहनाचा वापर उचित व किफायतशीर झाल्याची पडताळणी करता आलेली नाही.

4) शासकीय असूद केलेल्या वाहन क्रमांकाच्या वाहनाच्या (इतिवृत्त तक्तेवरुन) वाहन तेरा नोंदवहीचा हवा असूद तारखांचा दिवसापासून निरंक असल्याने शासकीय वाहन हे विनावापर बंद आहेत किंवा कसे याबाबत सक्षम अधिकाऱ्यांचे स्वाक्षरीचे वाहन बंद असचा विनावापर पडून असल्याबाबतचे कोणतेही प्रमाणपत्र असूद नसल्याने वाहनाबाबतची सत्यता पडताळता आलेली नाही. याबाबतचे अनुपालन होणे आवश्यक आहे.

वाहन क्रमांक	वाहनाचा प्रकार	वाहन तेरा रिरंक असल्याचा दिनांक
MH-34/8088		दिनांक 09/02/2012
MH-34M/7116		दिनांक 19/11/2011
MH-34/9732	फरार गाडी	दिनांक 30/11/2011
MH-34/7118		दिनांक 17/11/2011
MH- /396	कुरुंग गाडी	दिनांक 31/12/2012

वरील अनियमिततेमुळे वाहनाचा वापर उचित व किफायतशीर झाल्याची पडताळणी करता आलेली नाही. तरी याबाबत स्पष्टीकरण करून वाहन तेरा अद्ययावत पूर्ण करून अनुपालन तेरा परिच्छेदास दर्शविणे.

67	कालबाह्य निरुपयोगी झालेली वाहने निर्लेखीत न करणे बाबत.

माहे 2012 अखेर वाहन विभागाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार एकूण 32 इतकी वाहने असून त्या पैकी 12 इतकी वाहने ही बंद विनावापर अवस्थेत असून त्यापैकी एकूण 04 वाहने ही दहा वर्षापेक्षा जास्त कालावधीची आहेत. सदरहीतील उपरोक्त 12 वाहनी ते वाहनांचा विनावापर पडून असल्याचे तेरा परिच्छेदात दाखवून आलेले आहेत.

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) अवर सचिव वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वित्रम/1091/प्र.क.विनियम, दिनांक 01/01/1991 नुसार निरुपयोगी वाहनांचे सादरीत वाहन बाबत किमी मीटर गायब व अशक्य त्यामुळे वर्षापासून 10 वर्षाचा कालावधी झाल्यामुळे ते नादुरुस्त होऊन त्यानुसार वाहन निर्लेखन करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त माहितीनुसार पहाता उपलब्ध वाहनापैकी 12 इतकी वाहने बंद अवस्थेत असून त्यापैकी एकूण 04 वाहने यापैकी असून केव्हा पासून ही 10 वर्षे पेक्षा जास्त कालावधीची झालेली असून त्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची प्रमाणपत्र प्राप्त करण्याची आवश्यकता आहे. अशा वाहनांचे वेळ निर्लेखन करण्याची कार्यवाही प्राधान्याने होणे आवश्यक आहे. तरी याबाबत सदर कार्यवाही करण्यात यावी.

अ.क्र.	वाहन क्रमांक	खरेदीचा दिनांक	वाहन बंद झाल्याचा दिनांक	तपशील
1	MHG-9986	05/05/1977	01/02/2013	ट्रक (मोठा)
2	MTG-6334	16/04/1983	01/01/2014	फायर गाडी
3	MXF-8486	02/01/1984	01/01/2001	ट्रॅक्टर
4	MH-34-8088	08/03/1993	01/02/2013	जीप

2) प्राप्त माहितीनुसार महानगरपालिकेची एकूण 12 इतकी वाहने दिनांकापर्यंत पडून असल्याने त्यांचे वरील उपरोक्त शासन निर्देशानुसार लिलावाची कार्यवाही करण्यात यावी. तसेच वाहन व-याच कालावधी बंद अवस्थेत / दिनांकापर पडून असल्याने त्यांचे टायर, ट्यूब, बॅटरी इत्यादीसह इतर महत्वपूर्ण यांत्रिक सामानी नासधूस अथवा क्षतीग्रस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) उपरोक्त कार्यालयीन पोहोचपत्र संदर्भात सोबत दुय्यम निबंधक, नांदेडकडून प्राप्त झालेले पत्र, जिल्हाधिकारी कार्यालय, किल्ली मोटर यांचे बंद असल्याने रद्दबात करण्यात आलेले नाहीत. यामुळे सदर वाहनांची एकूण संख्या उपरोक्त शासन निर्णयातील रद्दबात नमूद नसल्याचे पेक्षा आपण दुरुस्ती किंवा काही या संदर्भात अभिलेख पडताळणी आलेली नाही. याबाबत स्थानिक अधिकारी यांचे कडून वाहनांचे निर्लेखन करावे किंवा कसे या बाबत मार्गदर्शन प्राप्त करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त अधिकारानुसार अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

68	सामान्य पावती पुस्तक (नमुना क्र. 2) अन्वये फी, शास्ती इत्यादी रकमा वसुल करणे बाबत

सन 2011-2012 (मार्च पर्यंतची) विविध विभागांकडून सामान्य पावती पुस्तक नमुना क्रमांक 2 अन्वये फी, शास्ती, रकमा इत्यादी विविध दराने वसुल करण्यात आली असून मार्च 2012 मधील वसुलात रक्कमा रकमांची पटणी नोंदवहीची (जमा बाजू) पडताळणी केली असता, संबंधीत विभागाने (उद्वहनपाटाकडून झाली नमूद केलेले विभाग) आकारलेले विभागाने पुरविलेली व महानगरपालिकेने छपाई केलेली पावती पुस्तके दुय्यम आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 12, 85, 86, 110 इत्यादी प्रमाणे महानगरपालिकेने वसुल करण्यात येणाऱ्या रकमांच्या संदर्भात विविध पावती पुस्तक व पावती नुसार रकमा वसुल करुन त्यांची नोंद पटणी नोंदवहीत घेताना सुरुवातीस खालील पावती पुस्तक क्रमांक व पावती क्रमांक अनुषंगे नोंद घेऊन सदरचा अभिलेख पडताळणी वेळेस महानगरपालिकेकडे उपलब्ध करण्यात येणे आवश्यक आहे. असे असताना नमूद विभागातील संबंधितांनी पावती पुस्तक क्रमांक व पावती क्रमांक यात खंड पडला नियमबाह्यरित्या पटणी नोंदवहीत नोंदी घेण्याची शक्यता अधिकारीवर्ग केल्याचे आढळून आले आहे. वरील पावती निहाय पटणी नोंदवहीत नमूद तपशील व रकमांची अचूकता लेखा परिक्षणावर पडताळणी झालेली नाही. तसेच सदर अनियमितता मुळे खालील पावती क्रमांक अनुषंगे रकमा वसुलात आणण्याचा हेतू उद्देश सफल झालेला नाही. तरी नियमानुसार महानगरपालिकेने मुद्रीत केलेल्या पावती क्रमांका प्रमाणे पटणी नोंदवही

तपशिल नोंदविण्याची व अभिलेखे अद्यावत ठेवण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

अ.क्र.	विभागाचे नाव	वसुल तपशिल		उदाहरणादाखल पावती क्रमांकात केलेला बदल	
		दिनांक	एकूण रक्कम	मुद्रीत पावती क्रमांक	पटणी नोंदवहीत नमूद पावती क्रमांक
1	जन्म-मृत्यु विभाग	01/03/12	278	443923 ते 443976	133/23 ते 133/76
2	विवाह नोंदणी विभाग	02/03/12	250	444019	4/19
3	अग्निशमन विभाग	01/03/12	150	442942	4/42
4	नगर रचना विभाग	01/03/12	1900	446841 ते 446845	3/241 ते 3/245
5	शिक्षण विभाग	01/03/12	210	445701 ते 445707	12/1101 ते 12/1107

---***---

69	मुद्रांक शुल्क सहायक अनुदान बाबत

सन 2011-2012 (महापालिका कालावधी) करीता महापालिकेस मुद्रांक शुल्क सहायक अनुदान म्हणून कीती निधी, कोणत्या कालावधीचा प्राप्त झाला इत्यादी बाबत ईकडील अर्धसमास पत्र क्रमांक 10, दिनांक 24/02/2014 अन्वये मागणी केली असता, याबाबत माहीती अप्राप्त असल्याने सन 2011-2012 करीता निरंक मुद्रांक शुल्क अनुदान आहे.

या बाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 तसेच मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 नुसार महापालिका क्षेत्रातील मालमत्ता विक्री किंवा दानाच्या बाबतीत मालमत्तेच्या मुल्यावर एक टक्का या दराने अधिभार म्हणून वसुल करून राज्य शासन त्या त्या महापालिकेस वसुल अधिभार रकमे इतके सहायक अनुदान म्हणून प्रदान करते. या अनुषंगाने सन 2011-2012 करीता महानगरपालिकेस शासनाने किती रकमेचे अनुदान मंजूर केले किंवा कीती अनुदान देय होते व त्या पैकी प्रत्यक्षात किती रकमेचे अनुदान प्राप्त झाले इत्यादी बाबतचा सविस्तर तपशिल लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. यामुळे महापालिकेस मार्च 2012 अखेर किती अनुदान प्राप्त होणे आवश्यक होते, किती शिल्लक होते किंवा कसेयाबाबतची अचुकता पडताळता आलेली नाही.

2) महानगरपालिकेने मुद्रांक शुल्क अनुदानाबाबत लेखा संहितेत नमूद मागणी नोंदवही क्रमांक 47 प्रमाणे अनुदान नोंदवही परिरक्षित केली नसल्याने महापालिका अस्तित्वात येण्यापूर्वीचे तत्कालीन नगरपालिकेचे सन 2011-2012 पूर्वीचे प्रलंबित राहीलेल्या अनुदान रकमांची तपशिलवार खात्री करता आलेली नाही. तरी संबंधित विभागाकडून याबाबत तपशिल उपलब्ध करून प्रलंबित अनुदान रकमा राहील्या असल्यास शासनाकडे प्रस्ताव सादर करून अनुदान प्राप्त करण्याची उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

---***---

70	रोजगार निधी नोंदवही परिरक्षित केले नसले बाबत.

सन 2011-2012 (महापालिका स्थापनेपासून) करीता लेखा विभागाकडील लेखा परिक्षणासाठी ई-मेलद्वारे प्राप्त झालेल्या पत्र क्रमांक 6 दिनांक 17/02/2014 नुसार रोजगार निधी नोंदवही उपलब्धते बाबत कळविले असता,उपरोक्त नोंदवही उपलब्ध केली नसल्याने रोजगार निधी नोंदवही परिरक्षित केलेली नाही. तथापि, तत्कालीन नगरपालिका प्रशासन, मुंबई यांचे पत्र क्रमांक GNC-1277/I.R/CR/84/13/3, दिनांक 19/11/1974 अन्वये एका वित्तीय वर्षामध्ये जिल्हानेरच्या एकूण महसूल अनुदानाच्या 35 टक्के इतकी रोजगार निधी म्हणून स्वतंत्र निधी उभारुन त्यात जमा करणे आवश्यक आहे. तरी महापालिकेने सन 2011-2012 अखेर पर्यंत असा रोजगार निधी उभारलेला नाही.

तरी, उपरोक्त निर्देशानुसार स्वतंत्र रोजगार निधी उभारुन अनुपालन दर्शवावे.

71	पाणी पुरवठा राखीव निधी बाबत

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 100 नुसार नमुना क्रमांक 72 मध्ये पाणी पुरवठा राखीव निधी म्हणून स्वतंत्र निधी उभारणे आवश्यक आहे. जेणे करुन पाणी पुरवठा योजनेसाठी विविध कामाचे नकाशे, आराखडे, अंदाजपत्रक तयार करणे व योजना अमलात आणणे इत्यादी महत्वपूर्ण व आवश्यक असा बाबींसाठी पुरेसा स्वतंत्र निधी वापरणे कामी उपलब्ध असेल म्हणून शासन निर्णयीत करेल अशा दराने व मुदतीसाठी पाणी पुरवठा राखीव निधी उभारण्याचा असून या अंतर्गत ठेवीच्या निधी तसा संस्थेची अनामत म्हणून ती ओळखली जाईल व प्रत्येक वर्षी दिनांक 1 जून पूर्वी आवश्यक ती रक्कम या निधीत जमा करण्यात येईल व महाराष्ट्र नगरपालिका (पाणी पुरवठा राखीव निधी नियम) नियम 1970 चे नियम 7 प्रमाणे असा निधी उभारुन ठेवला किंवा करी या बाबतचा अहवाल शासनास करणेचे आवश्यक असते. सदरची स्पष्ट तरतूद अस्तित्वात असतांनाही सन 2011-2012 अखेर महापालिकेने स्वतंत्र निधी उभारलेला नसल्याचे लेखा परिक्षणात आढळून आले आहे. तरी निधी उभारुन शासनास कळविणे बाबतचा अहवाल तातडीने अनुपालन करणे सादर होणे आवश्यक आहे.

72	अग्निशमन विभागाकडील परवाना शुल्क वसुली बाबत

